28 July 2026 page 02_Layout 1 27-07-2026 05:41 PM Page 1



## बहुजन सौरभ संपादकीय

# एससी कल्याणाचा निधी आता वारकरी महामंडळाला!

### स्वतंत्र एससी बजेट कायदा ही काळाची गरज

भारतीय राज्यघटनेने सामाजिक न्यायाला सर्वोच्च स्थान दिले आहे. हजारो वर्षांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक वंचनेची भरपाई करण्यासाठी अनुसूचित जातींसाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या. त्यातूनच अनुसूचित जाती उपयोजना (SC Sub Plan) आणि त्यासाठीचा स्वतंत्र निधी अस्तित्वात आला. हा निधी कोणत्याही सरकारची कृपा नसून संविधानाने मान्य केलेला अधिकार आहे. आज प्रश्न असा आहे की अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी राखून ठेवलेला निधी प्रत्यक्षात त्याच समाजाच्या विकासासाठी खर्च होतो का? अनेक वर्षांपासून सामाजिक संघटना, अभ्यासक आणि लोकप्रतिनिधी असा आरोप करीत आहेत की या निधीचा काही भाग इतर योजनांकडे वळविला जातो किंवा त्याचा अपेक्षित लाभ अनुसूचित जाती समाजापर्यंत पोहोचत नाही. या पार्श्वभूमीवर निधीच्या वापराबाबत पारदर्शकता आणि कायदेशीर संरक्षणाची मागणी अधिक तीव्र झाली आहे. याची अनेक उदाहरणे यापूर्वी चर्चेत आली आहेत. काही राज्यांमध्ये अनुसूचित जाती उपयोजनेतील निधी रस्ते, पूल, सार्वजनिक इमारती किंवा सर्वसामान्य पायाभूत सुविधांवर खर्च झाल्याबद्दल आक्षेप नोंदविण्यात आले. अशा कामांचा लाभ सर्व समाजाला होत असला, तरी अनुसूचित जातींच्या थेट विकासाशी त्यांचा संबंध नसल्यास त्या खर्चावर प्रश्न उपस्थित झाले. त्याचप्रमाणे काही वर्षांत मंजूर झालेला निधी खर्च न झाल्याने तो परत जाणे किंवा इतर खात्यांकडे वळविण्यात आल्याचेही विविध अहवालांमध्ये नमूद करण्यात आले आहे. या घटना निधीच्या नियोजनातील त्रुटी दाखवून देतात. समजा एखाद्या विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्तीसाठी सरकारने निधी मंजूर केला आणि तो निधी दुसऱ्याच कामासाठी वापरला गेला, तर त्या विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू शकते. त्याचप्रमाणे अनुसूचित जातींच्या वसतिगृहांसाठी, कौशल्य विकासासाठी, उद्योजकतेसाठी किंवा आरोग्य सेवांसाठी असलेला निधी इतरत्र वळविला गेला, तर त्याचा फटका लाखो वंचित कुटुंबांना बसतो. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणाला मुक्तीचा मार्ग मानले. राजर्षी शाहू महाराजांनी मागास समाजासाठी आरक्षण, वसतिगृहे आणि शैक्षणिक सुविधा सुरू केल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत समान संधीचा अधिकार दिला. या तिन्ही महामानवांचा विचार स्पष्ट होता, वंचितांसाठी राखीव असलेली साधने आणि संसाधने त्यांच्याच उन्नतीसाठी वापरली गेली पाहिजेत. जर अनुसूचित जातींच्या निधीचा वापर इतर उद्देशांसाठी होत असल्याबाबत शंका निर्माण होत असेल, तर शासनाने संपूर्ण माहिती जनतेसमोर ठेवली पाहिजे. कोणत्या योजनेसाठी किती निधी मंजूर झाला, किती खर्च झाला, लाभार्थी कोण आहेत आणि त्याचा अनुसूचित जाती समाजाला थेट कसा फायदा झाला, याचा सार्वजनिक लेखाजोखा उपलब्ध असला पाहिजे. पारदर्शकता हा लोकशाहीचा मूलभूत आधार आहे. याच कारणामुळे ‘एससी बजेट कायदा’ ही मागणी आता केवळ सामाजिक संघटनांची राहिलेली नाही, तर ती संविधाननिष्ठ नागरिकांची मागणी बनत आहे. या कायद्यात अनुसूचित जातींसाठीचा निधी इतर कोणत्याही योजनेकडे वळविता येणार नाही, निधी खर्च न झाल्यास तो पुढील वर्षी त्याच उद्देशासाठी राखून ठेवला जाईल, प्रत्येक विभागाने स्वतंत्र अहवाल सादर करावा आणि त्यावर विधिमंडळात चर्चा होईल, अशा तरतुदी असणे आवश्यक आहे. आज अनुसूचित जाती समाजात उच्च शिक्षण, बेरोजगारी, उद्योजकता, आरोग्य आणि निवास या क्षेत्रांत मोठी आव्हाने आहेत. या समस्या सोडविण्यासाठी आर्थिक संसाधनांची नितांत गरज आहे. त्यामुळे या निधीचा प्रत्येक रुपया योग्य ठिकाणी आणि योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे ही शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे. हा विषय कोणत्याही धर्माचा, समाजाचा किंवा परंपरेचा विरोध करण्याचा नाही. प्रश्न फक्त एवढाच आहे की अनुसूचित जातींसाठी राखून ठेवलेला निधी त्या समाजाच्या सर्वांगीण विकासासाठीच वापरला जावा. सामाजिक न्यायाची खरी कसोटी याच ठिकाणी लागते. आज गरज आहे ती संघर्षपेक्षा अधिक सजगतेची, आरोपांपेक्षा अधिक पारदर्शकतेची आणि घोषणांपेक्षा अधिक कायदेशीर हमीची. म्हणूनच एकच मागणी बुलंद झाली पाहिजे, ‘एससीचा निधी एससीसाठीच!’ ‘एससी बजेटला स्वतंत्र कायदेशीर संरक्षण द्या!’ ही मागणी कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून भारतीय राज्यघटनेतील सामाजिक न्याय, समान संधी आणि संविधानिक उत्तरदायित्व यांचे संरक्षण करण्याची मागणी आहे. ●●

# माझे महाविद्यालय, माझी जबाबदारी

आपण सुरू केलेला, राबविलेला एखादा उपक्रम जेव्हा इतरांना प्रेरणा देतो, प्रोत्साहक ठरतो किंवा अंमलात आणला जातो, तेव्हा निश्चितच खूप आनंद होतो. काल मी एमआयडीसी, बुटीबोरी, नागपूर येथील 'कृतज्ञता विद्यार्थी गृह' येथे 'भारतीय संविधानाला अभिप्रेत समाजकार्य' या विषयावरील माझ्या व्याख्यानाच्या निमित्ताने भेट दिली असता तेथील इमारतीवर लिहिलेले 'माझे वसतिगृह, माझी जबाबदारी' हे स्लोगन पाहून खूप आनंद झाला. याची प्रेरणा तुम्हीच असे 'कृतज्ञता'चे सचिव डॉ. दादाराव बनकर यांनी सांगितल्यावर मनातल्या मनात स्वतःचेच कौतुक वाटले. सोबत, 'कृतज्ञता'चे विश्वस्त माजी सनदी अधिकारी इ. झेड. खोब्रागडे, रेखाताई खोब्रागडे व माझी पत्नी छाया मेश्राम होती.

कोरोना काळातील 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' हे स्लोगन मनाला खूप भावले. महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि कार्यरत शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी संरक्षणात्मक उपाययोजना म्हणून 'ऑरेंज सिटी कॉलेज ऑफ सोशल वर्क, नागपूरमध्ये मी प्राचार्य म्हणून माझ्या अधिकारात 'माझे महाविद्यालय, माझी जबाबदारी' हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केला. 'माझे महाविद्यालय, माझी जबाबदारी' हे केवळ एक स्लोगन नाही. महाविद्यालयाच्या विकासाचे दिशा-निर्देशक तत्व आहे. गुणवत्तापूर्ण विकासासाठी कर्तव्ये व जबाबदारीचे भान विसरू न देता सांघिक प्रयत्न करण्याची मार्गदर्शक धारा आहे. आपली पाऊले उजेडदिशेनेच पडावीत, याची सकारात्मक काळजी यातून निर्माण होते आणि संवेदनशील कृतिशीलतेचे बळ मिळते. यामुळे, आपल्या वाटा प्रशस्त होतात. कर्तव्ये व जबाबदारीची जाणीव होते. जबाबदेहीपणा विकसित होतो. कोरोनानंतरही हा उपक्रम आम्ही सुरूच ठेवला. महाविद्यालयात बीएसडब्ल्यू प्रवेशासाठी 'माझे महाविद्यालय, माझी जबाबदारी' या उपक्रमाने सांघिक सामर्थ्य निर्माण केल्यामुळेच गेल्या सहा वर्षापासून दरवर्षी आम्ही आमची इन्टेक विहित मुदतीपूर्वीच पूर्ण करू शकलो आहोत. नॅक मूल्यांकन प्रक्रियेतही याचा खूप फायदा झाला. B++ या श्रेणीपेक्षाही आमच्यात शिस्तबद्ध सांघिक कार्यसंस्कृती निर्माण झाली याचा विशेष आनंद आहे.




यामुळेच दरवर्षी होणाऱ्या 'इंडिया टुडे'च्या सर्वेक्षणातही आम्ही यशस्वीपणे सहभागी होऊ शकलो. प्रतिष्ठित अशा 'आऊटलुक' मॅक्झिननेही आमच्या कामाची नोंद घेतली. 'संविधान फाऊंडेशन'ने सुद्धा 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर संविधान सन्मान' देऊन आमचा गौरव केला. 'उतू नका, मातू नका, घेतला वसा टाकू नका...' हा विचार कायम मनात ठेवून आमचा चांगुलपणाचा प्रवास सुरू आहे. 'कृतज्ञता'ने 'माझे वसतिगृह, माझी जबाबदारी' हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सहभागाने सुरू केला. डॉ. दादाराव बनकर यांच्या मार्गदर्शनात वसतिगृहाचे संपूर्ण व्यवस्थापन विद्यार्थ्यांच्या मार्फत केले जाते. असे करणारे कदाचित हे देशातील पहिले वसतिगृह असावे. 'कृतज्ञता' हा केवळ भाव नाही. माणसाने कसे जगावे? याचे आत्मभान आहे. कृतिशील संविधानिक जीवनमूल्य आहे. आयुष्याला आकार देणाऱ्यांप्रति साभार पोच आहे. प्रत्यक्ष आचरणात आणावयाचा करुणेचा अखंड वाहता झरा आहे. अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करण्यासाठी यशस्वी व समृद्ध जीवनमार्गाची आधारशीला आहे. जे आपल्या जगण्यात कृतज्ञतेचे नितीतत्व अनुसरतात ते सुख, समाधान व संपन्नतेची फुले मुक्तपणे उधळत असतात.

वरोरा येथील 'ज्ञानदा'च्या सहाय्याने उच्च शिक्षण पूर्ण करून स्वयंप्रकाशित झालेल्या सूर्यकुळातील काही लेकरांनी ज्ञानदा व त्याचे संकल्पनाकार प्रा. मधुकर उपलेंचवार यांच्या निस्वार्थ सेवावृत्तीप्रति शाश्वत आभार व्यक्त करुन ज्योतीने ज्योत पेटविण्या नागपूरातील बुटीबोरी येथे 'कृतज्ञता' वसतिगृहाची निर्मिती केली. उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे व अपरिहार्य साधन असले तरी भांडवलशाहीने शिक्षण महाग केले. हे ओळखून गरीबातील गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणासाठी 'ज्ञानदा'तून सेवेची कृतिशील दीक्षा घेतलेल्या डॉ. दादाराव बनकर, प्रा. ज्ञानेश वाकुडकर, इ. झेड. खोब्रागडे, अमृत लोणारे, प्रभू शेंडे, दिलीप अग्रवाल, अरविंद काळे या माजी विद्यार्थ्यांनी 'रिसर्च अँड डेव्हलपमेंट असोसिएशन ऑफ इंडिया नावाच्या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून कृतज्ञतेचे वृक्षारोपण केले. हे सेवावृक्ष आता पंचविस वर्षांचे झाले आहे. हजारो विद्यार्थी या वृक्षाच्या सावलीत जगले, लढले आणि वाढले सुद्धा. कृतज्ञता वसतिगृहाची सेवाभावी कार्यकर्ते नागपूर शहरातील दात्यांच्या घरी जातात. त्यांच्याकडे असलेली रद्दी, भंगार, टाकावू वस्तू व कबाडी संकलित करून ती विकतात. त्यातून आलेल्या पैशातून व आर्थिक दानातून विद्यार्थ्यांच्या निवास, भोजन, अभ्यासाची सोय व स्पर्धा परीक्षेसाठी अभ्यासिका असलेली सुसज्ज इमारत उभी झाली. रद्दीतून बुद्धी वाढविण्याचे संस्कार येथे होतात. मागासवर्गीय, गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्याला येथे प्रवेश दिला जातो. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील, नक्षल पोलीस चकमकीत मारल्या गेलेल्यांच्या कुटुंबातील, तसेच पारधी-आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांस येथे प्राधान्याने प्रवेश दिला जातो. शंभर विद्यार्थ्यांचे भोजन, निवास, संगणक, इंटरनेट, वह्या-पुस्तके, अभ्यासिका अशी आधुनिक सुसज्ज सोय असणाऱ्या कृतज्ञता वसतिगृहाच्या कामाला डॉ. दादाराव बनकर यांनी व्रतस्थपणे वाहून घेतले आहे. त्यांच्या व्हिजनरी पर्यवेक्षणातून व 'माझे वसतिगृह, माझी जबाबदारी' हे ब्रीद काळजावर कोरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण सहभागातून होत असलेली 'कृतज्ञता'ची ठेवण व व्यवस्थापन हे सरकारी यंत्रणेला व सरकारी वसतिगृहाला मार्गदर्शक आणि दिशा दिग्दर्शक ठरेल अशीच आहे. ज्यांच्यामुळे आपण घडलो, ज्यांनी आपल्या आयुष्याला विकसित वळण दिले त्यांच्याप्रति रचनात्मक आभार व्यक्त करणारे विद्यार्थी सहभागाचे 'कृतज्ञता'चे हे आदर्श उदाहरण अनेकांना प्रेरणा, प्रोत्साहन व बळ देणारे आहे.



प्रा. डॉ. महेंद्रकुमार मेश्राम
मो.9975665862

गडचिरोली जिल्ह्यातील मेंढा (लेखा) येथे देवाजी तोफा यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेला 'आमच्या गावात, आम्हीच सरकार' हा प्रयोग पुढे आदिवासी स्वशासनाचे व ग्राम विकासाचे ऐतिहासिक आदर्श उदाहरण ठरले. लोकसहभागाची राळेगणसिद्धी, हिवरे बाजार व पाटोदा पॅटर्न सर्वांनाच प्रेरणादायी व प्रोत्साहित करणारे आहेत. पुस्तकातील लोकसहभाग शिक्षण क्षेत्रातही दिसला पाहिजे. 'पे बॅक टू सोसायटी' हा मूलमंत्र स्वीकारणे काळाची गरज आहे. शिक्षणापासून वंचीत असणाऱ्यांच्या जीवनातील अंधार दूर करुन नव्या प्रकाशवाटा निर्माण करण्यासाठी 'माझे महाविद्यालय, माझी जबाबदारी', 'माझे वसतिगृह, माझी जबाबदारी', 'माझी शाळा, माझी जबाबदारी', माझे कार्यालय, माझी जबाबदारी' असे दिव्याने दिवा लावणारे रचनात्मक उपक्रम राबविल्यास अनेक प्रश्नांचे सहज निरसन होईल, असे वाटते. ●●

# हिंदुत्व प्रबोधनकाराचे, शेंडी जानव्यांचे आणि ओबीसी मराठा हीत.

शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्व सोडल्याचे आरोप उपचानक्य आणि संघ नेत्यांनी युती तुटल्यानंतर वारंवार केले. बरेच दिवस टीका सहन केल्यानंतर संयमी दिसत असलेल्या उद्धव ठाकरेंनी आपले आजोबा प्रबोधनकार ठाकरे यांच्या स्टाईलमध्ये खमक्या भाषेत उत्तर दिले. आमचे हिंदुत्व हे केवळ ‘शेंडी-जानव्यांचे हिंदुत्व नाही. शेतकरी - कष्टकरी ओबीसी, दलित, आदिवासी इत्यादी तमाम कष्टकरी समाजाचे हीत पाहणारे आमचे हिंदुत्व’ असल्याचे उद्धवजी ठाकरे यांनी ठणकावून सांगितले. त्यांच्यावर हिंदुत्व सोडल्यांचा आरोप करणाऱ्यांनी त्यांच्या उत्तराचे खंडण देखील केलेलं पाहायला मिळाले नाही. हिंदुत्वाच्या आड लपलेल्या जुलमी पुरोहितशाहीला प्रबोधनकारांनी जोरदार फटकारे मारले. उद्धवजी ठाकरे यांनी देखील रेशिमबागेचा उल्लेख करुन शेंडी जानव्यापुरत्या हिंदुत्वाचे बुरखे फाडले. सर्वांची काळजी घेणाऱ्या न्यायी बळीराजाला कपटाने पाताळात घालणारा खलनायक वामन आपण वाचला आहे. ब्राम्हणांचे वर्चस्व आणि ब्राम्हणेरांच्या जीवनाचे मातेरे करणारी अमानवी जातीव्यवस्था टिकवून ठेवणारे हिंदुत्व टिकवण्यासाठीच्या कपट नाट्याचा प्रयोग अनुभवायला येत आहे. उद्धवजी ठाकरे यांना आपल्या सत्यशोधक आजोबांचा अस्सल सांस्कृतिक संघर्ष आठवल्याने त्यांनी कणखर भूमिका घेतली. त्यांच्या या भूमिकेवर कोणीही प्रतिउत्तर दिलेले नाही. प्रबोधनकाराच्या हिंदुत्वाला कमअस्सल हिंदुत्व म्हणायची हिंमत कोणीही केली नाही. परंतु पाताळयंत्री वामनी इडापिडा त्वेषाने कामाला लागली. न्यायाच्या, समतेच्या बाजुने उभे असलेल्या, लोकांना सुखी - समृद्ध करु पाहणाऱ्या, शेतकरी बळीराजाचे हीत पाहणाऱ्या बळी पुत्रांना इडापिडेच्या बेड्या ठोकण्याच्या षडयंत्रांना गती देण्यात आली. इडापिडेचा धाक दाखवून काहींना बिभीषण बनवून घरे फोडण्यासाठी डाव रचला गेला. मोहीम फत्ते करण्यासाठी नारदी मिडिया आणि इतर साधने चलाखीने वापरण्यात आली. फत्ते झाली. परंतु शिकलेल्या बळीपुत्रांनी हे अत्यंत हीनदर्जाचे खेळ उघड्या डोळ्यांनी पाहिले. दोन दिवसांपूर्वी भ्रष्टाचाराचे आरोप करणारे, लगेच त्यांना अस्सल हिंदुत्ववादी म्हणायला लागतात. भ्रष्टाचाराचे आरोप थांबवले जातात, भ्रष्टाचाराच्या बातम्या येणे थांबतात, एवढेच कशाला चौकशा देखील थांबताना दिसतात. या सर्व घडामोडींचे निरीक्षण शिकलेली शेतकरी ओबीसी मुले करीत आहेत. त्याचा अन्वयार्थ लावत आहेत. हिंदुत्वाच्या चर्चेची उकल करत आहे. या घटनाक्रमाला सामाजिक पार्श्वभूमी असल्याने त्यादृष्टीने त्याची उकल होणे आवश्यक आहे. संघप्रमुख, ब्राह्मण सर्वांचा गुरु असल्याचे सांगणारा मनुस्मृतीतील श्लोक उच्चारतात. ब्राह्मण श्रेष्ठत्वाची जाहीर वाच्यता करतात. ओबीसी बहुजनांना निच मानणाऱ्या मनुस्मृतीचा गौरव करतात आणि त्या परंपरेचा गौरवशाली परंपरा म्हणून उल्लेख करतात. त्याला ते अस्सल हिंदुत्वाचा आधार ठरवतात. या प्रकारचे हिंदुत्व मानणे शेतकरी, कष्टकरी ओबीसी, दलित, आदिवासी बहुजन समाजावर अन्याय करणारे आहे. शेतकरी ओबीसी बहुजनांना हिन, दुय्यम ठरवणारे हिंदुत्व शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे राहू शकत नाही. तरीसुद्धा सामाजिक प्रतारणा आणि दुय्यमत्व स्वीकारणाऱ्या राजकारणातील बहुजन म्होरक्यांकडून या व्यवस्थेला मान्यता मिळवण्याचा कावा केला जात आहे. याउलट प्रबोधनकार ठाकरे यांची हिंदुत्वाची भूमिका शेतकरी ओबीसी बहुजनांना लुटणाऱ्या पुरोहितशाहीचा धिक्कार करणारी आहे. सिंधू संस्कृतीशी नाते जोडणारी आहे. शेतकरी कष्टकरी ओबीसी बहुजनांची बाजू घेणारी आहे.



बाबा बिडकर
मो.- 9923863405

हिंदुत्वाच्या चर्चेच्या या पार्श्वभूमीवर ओबीसींचे हीत हिंदुत्वाच्या कोणत्या प्रकारात होईल या अंगाने देखील चर्चा होणे अपरिहार्य आहे. सत्यशोधक प्रबोधनकार ठाकरे यांचे लेखन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई यांनी प्रकाशित केले. खंड चौथा हा हिंदुत्व नावाने प्रकाशित करण्यात आला. यात हिंदुधर्माचे दिव्य आणि संस्कृतीचा संग्राम, हिंदु जनांचा ऱ्हास आणि अधःपात (बॅरि. एस. सी. मुकर्जी यांच्या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद) तसेच देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे या पुस्तकांचा समावेश आहे. या पुस्तकातील त्यांची मांडणी आणि प्रबोधन पत्रातून त्यांनी केलेले लेखन तसेच ग्रामण्याचा इतिहास इत्यादी संदर्भ लक्षात घेतले तर त्यांची हिंदुत्वाची भूमिका ही शेतकरी ओबीसी बहुजन हिंदुंच्या शोषणाविरोधात संघर्ष करणारी राहिलेली आहे. याच्या अगदी उलट ओबीसी, दलित, आदीवासींचे शोषण ज्या जातिव्यवस्थेच्या आधाराने हजारो वर्षे चाललेले आहे, ती जातीव्यवस्था टिकवून धरणारे हिंदुत्व,




मनुस्मृतीचा आधार मजबूत करुन ओबीसींना लुटणारे, अपमानित करणारे हिंदुत्व आहे. शोषणव्यवस्थेचा फास घट्ट करणारे शेंडी जानव्यांचे हिंदुत्व आहे.

ओबीसींच्या विरोधातील हिंदुत्व, बळीराजाशी धोकेबाजी करणाऱ्या बटुवामनाचा आदर्श घेणारे हिंदुत्व म्हणजे इडापिडा आहे. ओबीसी बहुजनांची काळजी घेणारे हिंदुत्व प्रबोधनकारांनी मांडले आहे. म्हणूनच उद्धवराव ठाकरे आम्हाला शेंडी जानव्यांचे हिंदुत्व मान्य नसल्याचे धाडसाने सांगतात. प्रबोधनकारांचे ओबीसी बहुजनवादी हिंदुत्व आणि बहुजनांना पिडणारे हिंदुत्व यापैकी ओबीसींच्या जवळचे हिंदुत्व कोणते? हे स्पष्ट आहे. म्हणून हिंदुत्वाची ही नौटंकी ओबीसी विरोधी आहे. मनुस्मृतीचे समर्थन करणाऱ्या हिंदुत्वाच्या बाता करणारे शेतकरी, कष्टकरी ओबीसी, दलित, आदिवासी आणि संपूर्ण महिलांच्या विरोधातील खलनायक आहेत. त्यात बहुजन देखील सहभागी झालेले दिसतात. परंतु ते आत्मभान हरवलेले आहेत. फितूर झालेले आहेत. काही फसवले गेले आहेत. असल्या बोगस हिंदुत्वाच्या गप्पाड्यांकडून ओबीसींचे अहीत करणारे षडयंत्र रचले जात आहे. जातिनिहाय जनगणनेच्या प्रश्नाला बगल देण्यासाठी असले खेळ सातत्याने खेळले जात आहे. ओबीसी बहुजन युवांनी, शेतकरी पुत्रांनी आपल्या विरोधातील असले डावपेच उधळून लावण्यासाठी जोमाने संघर्ष करणे निकडीचे आहे. ●●

इडापिडा टळो।
बळीचे राज्य येवो ।।

# वंचितांच्या दुखण्यावर जालीम उपाय,




**हिंदू धर्माच्या बंद कारागृहातून निघून राष्ट्रीय प्रवाहात येण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व वंचितांना समान संधी मिळवून दिली. बौद्धांनी संधीचे सोने केले. हिंदू धर्माने दिलेल्या अनेक प्रचंड यातना याच्या मुळाशी आहेत. यातनांची पकळ धट्ट करण्याचा हजारो वर्षांचा हिंदू धर्माचा इतिहास आहे.ब्राह्मणवाद्यांनी फसवणुकीचा टाकलेला डाव म्हणजेच हिंदू संस्कृतीची गुलामगिरी. हिंदू धर्माच्या गुलामगिरीने माणसाचे मनुष्यत्वच नाकारले. ब्राह्मणांनी स्वार्थासाठी केलेली ही साम्राज्यशाही योजना आहे.**

ब्राम्हणांच्या ब्राम्हणेतरावरील अत्याचाराला जगात तोड नाही. भीती, चमत्कार, संमोहनासाठी भटांनी हिंदू देवी-देवता निर्माण केल्या. त्याना स्वार्थाचे साधन केले. यातून निघण्याचा मार्ग बंद केला. उलट संमोहन वाढण्यासाठी अनेक युक्त्या केल्या. फसवणूक, अंधश्रद्धा, धर्मांधता पसरवली. शिक्षण, विकास, आनंद, समाधान परमेश्वराने वंचित व स्त्रियांना नाकारल्याचा गवगवा केला. धुर्त ब्राह्मणाने स्वतःला प्रत्यक्ष परमेश्वराचा रूप असल्याचा गाजा-वाजा केला. ब्राम्हणांचा परमेश्वराशी डायरेक्ट संबंध असल्याचा प्रचार केला. मनात येईल तेंव्हा परमेश्वराशी संपर्क करू शकतो असे चतूर, कपटी भटांनी शिताफीने इतरांना मोहित केले. बुद्धिचा उपयोग मानवी ऱ्हासासाठी केला. ब्राम्हणांनी इतरांच्या जीवनात, संसारात मनात येईल तेंव्हा वाटेल त्या प्रकारे हस्तक्षेप केला. त्यांना हा अधिकार धर्मग्रंथ संम्मत, विधी संम्मत केला. त्यांच्या अधिकारासाठी परमेश्वराने ग्रंथ निर्मिती केली याचा प्रचार केला. जगात ब्राम्हणासारखा बंडलबाज, दगाबाजी, मानवतेचा संहारक दुसरा नाही.

भारतीय समाज अत्याचार मुक्त करण्यासाठी अनेक संत, महंत, साधू, संन्यासी, पुढारी, समाज-सुधारक पुढे आले. त्यांनी अत्याचारात राहून अत्याचार मुक्त करण्याची शिकस्त केली. पाण्यात राहून मगराशी वैर शक्य नाही. भटांच्या कपटाला भेदण्याचे धैर्य, कोणीही दाखवले नाही. हिंदू देवी-देवतांची, धर्मग्रंथांची समिक्षा कोणीही केली नाही. मुलनिवासींच्या देशात भद्र, भट, द्विज, विप्र, सुज्ञ, ब्राम्हण ब्रम्हाच्या मुखातून जन्माला आले असे भट आणि धर्मग्रंथ सांगतात. म्हणजे ब्रम्हाचे मुख जननेंद्रिय होते. मुखाने समागम केला. ब्रम्ह पुल्लिंगी, स्त्रिलिंगी, नपुंसक की कोण? ब्रम्ह भारताचा मुलनिवासी होता कां? जगात ब्रह्माचे अस्तित्व असलेल्या देशाचा, राज्याचा पुरावा नाही. अज्ञानात भारत हेच विश्व समजले गेले. तसे धर्मग्रंथ, भटांनी लिहिले. जीवनात नेहमी परिवर्तन घडतात. परिवर्तनाला भट मानत नाही. जगात देव नाही याची ब्राम्हणांना १००% खात्री आहे. म्हणून देवाच्या शपथेने खोटे बोलतात. स्वार्थासाठी खोटी वचने समाजावर लादतात. श्रद्धाळुंना लुबाळतात. असे केले नाही तर तसे होईल, आपत्ती कोसळेल अशा विधानात फसवतात. सत्य वाटेपर्यंत रेटतात. इतरांना स्वर्गाचे, मोक्षाचे गाजर दाखवतात. राहू, केतू, साडेसाती, ग्रह ताऱ्यांची भीती दाखवतात. कमी खर्चात पूजापाठ, कथापाठ करून संकट दूर करण्याची श्रद्धाळूवर भूल टाकतात. पाकेटभर पैसे, पिशवीभर ड्राय फ्रूट्स, केटलीभर साजूक तुपासाठी बेइमानी करण्यात त्यांना लाज वाटत नाही. अत्यंत साधे दगड मुल्यवान ठरवून महागड्या किंमतीत राशी रत्न ठरवून भोळ्या भाबड्या श्रद्धाळुंना लुटतात. लोकांना लुबाडले तरी देव आपले काही बिघडत नाही याची त्यांना पुरेपूर जाणीव आहे.

विद्या व्यासंग



प्राचार्य भाऊ वासनिक
9423606064

देव आणि माणसात दलाली करणाऱ्या भटांना ना देवाची ना समाजाची भीती. ब्राम्हणाचा मस्तकाला स्पर्श आशिर्वाद तर अस्पृश्यांचा, वंचितांचा स्पर्श अपराध ठरवण्यासाठी ब्राम्हणवादी संघटना; रास्वंसे संघ, विहिंप, बजरंग दल, भाजपा तसेच संघांतर्गत निर्माण सर्व संस्था युद्ध स्तरावर साम्राज्यशाही प्रस्थापित करण्यात प्रयत्नशील आहेत. इतरांचे दुःख, वेदना, अपंगत्व, घातपात देवापर्यंत पोहोचवणाऱ्या भटांना दुःख, यातना, मृत्यू कां? अमर न दिसणारे अमरत्वाचा वरदान देणारे देव भटांनी देशात निर्माण केले. देशात ४० हजार देवी-देवता पैकी वर्ण, जाती, मानवी द्वेष निर्माण करणारा देव कोण? भटांना सर्वोच्च स्थान देणारा देव भटांचा दलाल की भट देवांचा? ब्राम्हणांच्या अधिकारात देव की देवाच्या अधिकारात ब्राम्हण? मंदिरासाठी कष्ट न करणाऱ्या भटांना दान, चढावा स्वीकारण्याचा अधिकार कां? दुध, दही, ताक तुपासाठी गोमाताचे पालन, रक्षण, करून मलमुत्रादी सावटणारा, तिच्या निधनानंतर मातेसारखा अंत्य संस्कार करणारा ब्राम्हण कां नाही? मलई पुरती गोमाता आणि अंतानंतर शीव-शीव कां? याचे उत्तर कोणत्या धर्मग्रंथात आहे?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू-धर्म, देवी-देवतां, पंडित, पुजारी, पुरोहितांचे अस्तित्व, धर्माची नशा पडताळली. धर्मातील गुलामी व जाती विषमता शोधली. अंधश्रद्धा नसणारी श्रद्धा, आस्था गरिबांना शक्ती देते. हे त्यांनी अनुभवले. ईश्वर असलाच तर सर्वांसाठी समान राहील, भेदभाव करणार नाही, झगडे लावणार नाही, वाद पेटवणार नाही. डॉ. बाबासाहेब या निरिक्षणापर्यंत पोहोचले. विषमता, पक्षपात हिंदू धर्माचा पाया असल्याचे सत्य लपत नाही. देवाच्या नावाने भट स्वार्थ साधतो. प्रत्यक्षात देव, ईश्वर समाजात भीती निर्माण करणाऱ्या, वशीभूत, संमोहित करणाऱ्या संकल्पना आहेत. हे कळल्यावर बौद्धांनी त्यांचे विसर्जन केले. बुद्धाचा अत्त, दिप, भवं स्वीकारला. आस्था गरिबाला मानसिक आधार देते. डॉ. बाबासाहेब स्वतः जाती-वर्ण अत्याचाराचे भुक्त-भोगी होते. हलाखिच्या परिस्थितीतून तपून निघाले. गरिबी, जाती वर्ण द्वेषाचे चटके पदोपदी मायभूमीत त्यांनी अनुभवले. परदेशात जाती वर्ण द्वेष कशाला म्हणतात हे ही त्यांना कळले नाही. डॉ. बाबासाहेबांनी जगातील सर्वोच्च ज्ञान संपादन केले. विद्वत्ता, लेखनिच्या बळावर एकट्याने मायभूमीत वंचित, मागास वर्गाचा मुक्तीचा लढा पुकारला. स्वधर्मीयांचा द्वेष करणारी हिंदू संस्कृती चव्हाट्यावर आणली. मोर्चे, चळवळी, सभा, सम्मेलने, वृत्तपत्रातून समाज जागृत केला. निर्जीव समाजात जीव टाकला.

क्रमशः ■ ■

# शरद ऋतुचर्या




आयुर्वेदानुसार अश्विन व कार्तिक हे मराठी महिने, तसेच इंग्रजी कॅलेंडरनुसार सप्टेंबरच्या शेवटच्या दोन आठवड्यांपासून नोव्हेंबरच्या पहिल्या दोन आठवड्यांपर्यंतचा सुमारे ६० दिवसांचा कालावधी शरद ऋतू म्हणून ओळखला जातो. प्रत्येक ऋतूमध्ये निसर्गात आणि मानवी शरीरात विविध बदल होत असतात. या बदलांमुळे काही शारीरिक तक्रारी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे ऋतूनुसार आहार-विहार आणि ऋतुचर्येचे पालन केल्यास आरोग्य उत्तम राखता येते. भारतीय संस्कृतीत वर्षावास, चातुर्मास, श्रावण, नवरात्र, शरद पौर्णिमा यांसारख्या धार्मिक परंपरांना विशेष महत्त्व आहे. या काळात विशिष्ट फळे, कडधान्ये, धान्ये आणि पौष्टिक पदार्थ आहारात समाविष्ट करण्याची प्रथा आहे. हे पदार्थ केवळ परंपरेचा भाग नसून आरोग्यदृष्ट्याही अत्यंत उपयुक्त आहेत.

शरद ऋतूमध्ये पावसाचा जोर कमी होतो. दमट वातावरणाऐवजी कधी ऊन तर कधी हलका पाऊस अशी परिस्थिती निर्माण होते. सकाळचे वातावरण आल्हाददायक असते, दुपारचे ऊन तीव्र असते, तर रात्री गारवा जाणवू लागतो. चांदण्यांनी भरलेले निरभ्र आकाश आणि सर्वत्र पसरलेली हिरवळ मनाला प्रसन्न करणारी असते. आयुर्वेदानुसार या ऋतूमध्ये वाढलेल्या उष्णतेमुळे शरीरातील पित्तदोषाचा प्रकोप होतो. त्यामुळे आम्लपित्त, छातीत जळजळ, डोकेदुखी, अंगाची आग होणे, तोंड येणे अशा पित्तजन्य तक्रारी वाढू शकतात. अशावेळी पित्तशामक आहार आणि जीवनशैलीचा अवलंब करणे आवश्यक आहे. या काळात त्रिफळा, मनुका, आवळा यांसारख्या पित्तशामक द्रव्यांचा उपयोग फायदेशीर ठरतो. आहारात मधुर, तिक्त (कडू) आणि कषाय (तुरट) रसप्रधान, हलके व शीत गुणधर्म असलेले पदार्थ घ्यावेत. जव, गहू, तांदूळ, मूग, मटकी, हरभरा यांसारखी धान्ये व कडधान्ये उपयुक्त आहेत. कारले, मेथी यांसारख्या कडू भाज्यांचा समावेश करावा. या ऋतूत उपलब्ध होणारे आवळा, संत्रे, मोसंबी, चिकू, कवठ यांसारखी फळे शरीरातील पित्त कमी करण्यास मदत करतात. धने, जिरे आणि कोथिंबीर यांचा वापर वाढवावा, कारण ते शीत गुणधर्माचे असून पचनालाही सहाय्य करतात. शरद ऋतूमध्ये येणाऱ्या विविध सणांच्या निमित्ताने तयार होणारे मोदक, पुरणपोळी, नारळी भात, नारळाची वडी, लाडू यांसारखे पदार्थ हरभऱ्याची डाळ, गूळ, तूप, गहू, नारळ यांपासून बनविले जातात. हे पदार्थ योग्य प्रमाणात सेवन केल्यास शरीराला ऊर्जा मिळते आणि पित्त संतुलित राहण्यास मदत होते. या ऋतूमध्ये मनुष्याची पचनशक्ती आणि शारीरिक बल मध्यम स्वरूपाचे असते. त्यामुळे अति खाणे टाळून संतुलित व सहज पचणारा आहार घ्यावा. लसूण, आले, अतितिखट व मसालेदार पदार्थ, तेलकट अन्न, मद्यपान तसेच मांसाहार शक्यतो टाळावा, कारण हे पदार्थ पित्त वाढवणारे व पचायला जड असतात. शरद पौर्णिमेला चांदण्याखाली काजू, बदाम, मनुका, वेलदोडा व साखर घालून आटवलेले दूध पिण्याची परंपरा आहे. हे दूध पौष्टिक, धातुवर्धक व शरीराला बळ देणारे मानले जाते. शरद पौर्णिमेनंतर पचनशक्ती अधिक सुधारू लागते, त्यामुळे योग्य प्रमाणात पौष्टिक आहार घेता येतो. या ऋतूमध्ये उकाडा जाणवत असल्याने पुरेसे शीतल पाणी प्यावे. शरीराची आग होत असल्यास चंदन किंवा वाळा यांसारख्या शीत गुणधर्माच्या द्रव्यांचा लेप उपयोगी ठरतो. दुपारच्या उष्णतेपासून बचाव करण्यासाठी सैल, हवेशीर आणि सुती कपडे परिधान करावेत. सकाळी हलका व्यायाम, योग किंवा प्राणायाम करावा.

आरोग्यम् सुखसंपदा



डॉ. सूर्यकांता पाटील
मो. 9923338047

रात्रीच्या प्रसन्न वातावरणाचा लाभ घेण्यासाठी जेवणानंतर शतपावली करावी आणि काही वेळ निरभ्र आकाशाखाली फेरफटका मारावा. यामुळे मन प्रसन्न राहते, ताण कमी होतो आणि झोपही चांगली लागते. मात्र रात्री जागरण करू नये आणि दिवसा झोप घेणे टाळावे. आयुर्वेदाने सांगितलेली ऋतुचर्या ही केवळ परंपरा नसून आरोग्याचे शास्त्र आहे. ऋतूनुसार आहार, विहार आणि दिनचर्येचे पालन केल्यास अनेक आजारांपासून बचाव होतो आणि शरीर-मन निरोगी राहते. म्हणून प्रत्येकाने शरद ऋतूमध्ये योग्य आहार-विहाराचा स्वीकार करून निरोगी, आनंदी आणि आरोग्यसंपन्न जीवन जगावे.

स्वस्थ रहा, मस्त रहा! ●●

“ ज्ञानासारखी दुसरी कोणतीही संपत्ती नाही... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# पोरांनो, तुम्ही इतिहास निर्माण केलाय !

जिगरबाज पोरांनो, हातात लाठी, बंदुका, आसू गॅस, पॅलेट गन घेतलेले शेकडो पोलीस! प्रचंड दहशत आणि भीतीचे वातावरण! कधी काय होईल याचा नेम नाही! तरीसुद्धा या दडपशाही विरुद्ध न झुकता, न वाकता, शरण न जाता आपण जो इतिहास निर्माण केलाय त्याबद्दल तुम्हा सर्वांना हृदयापासून मानाचा मुजरा! आमच्या सरकारमध्ये राजीनामे होत नसतात अशी दर्पोक्ती, अहंकार, उन्मत्तपणा नसानसात भरलेल्या उर्मट आणि उथळ लोकांना आपण त्यांची जागा दाखवून दिली याचा इतिहास लिहिल्या जाईल.

जगाचा इतिहास हा तरुणाईचा इतिहास आहे हे आयुष्यभर खोट्या इतिहासात रमणाऱ्या खोटारड्यांना माहीत नसल्यामुळे त्यांनी तुम्हाला हलक्यात घेतले. परंतु 15 व्या वर्षी बाबू गेनू आणि 23 व्या वर्षी भगतसिंग या तरुणांनीच बलाढ्य गोऱ्यांना झुकविले होते. एवढा अभ्यास त्यांच्याकडे नसल्यामुळे किंवा असला तरी तो मान्य करण्याचा मोठेपणा नसल्यामुळे तुम्ही त्यांना पराभूत केले.

लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्यापेक्षा त्यांच्यासाठी एक अहंकारी मंत्री महत्त्वाचा होता. 'परीक्षा पे चर्चा' करणाऱ्यांनी आयुष्यात कधी परीक्षाच दिलेली नसल्यामुळे त्यांना तुमच्या मेहनतीचे मर्म समजले नाही. म्हणून एका मंत्र्याला वाचविण्यासाठी त्यांनी देशातील सर्व यंत्रणा कामाला लावली. परंतु तुम्ही त्यांचेही बाप निघाले. लाठ्या खाल्ल्या, जखमी झाले, रक्तबंबाळ झाले, केसेस अंगावर घेतल्या. परंतु हिम्मत हरले नाही. चौफेर सुरक्षेमध्ये स्टेजवरून आवेशात आपल्या छातीची मापे सांगणारे तुम्हाला घाबरून संसदेच्या मागच्या दाराने पळून गेले आणि सर्वांच्या लक्षात आले की तुम्हाला टक्कर देण्याची त्यांची छाती नाही.



तेव्हाच तुमचा विजय निश्चित झाला होता पोरांनो!

हिम्मतबाज पोरांनो, तुम्ही आधुनिक काळातील Gen Z आहात. तुमचे लिहिणे, बोलणे, वागणे, भाषा सगळे काही फार वेगळे आहे. त्यामुळे बुरसटलेल्या विचारांच्या लोकांनी तुम्हाला समजून घेण्यात गफलत केली. 75 वर्षाच्या अशिक्षित प्रधानाला तुमच्यासारख्या उच्चशिक्षित पोरांची भाषा समजणे तर फारच कठीण! तुम्हीच त्यांना सत्तेपर्यंत पोहोचविले याचाही त्यांना विसर पडला आणि त्यांनी तुमच्यावरच आक्रमण केले. ही शुद्ध बेईमानी होती. पण तुम्ही जराही घाबरले नाही. आमच्या पोरींनी तर कमालच केली! जिजाऊ, सावित्री, अहिल्या, रमाई यांचे कार्य आम्ही फक्त ऐकून, वाचून होतो; पण आज या पोरींमध्ये अवतरलेल्या या सर्व महानायिका प्रत्यक्षात देशाने अनुभवल्या. जिजाऊ-सावित्रीचा वारसा खऱ्या अर्थाने कृतीमध्ये आणणाऱ्या या पोरी येणाऱ्या काळात या देशात निश्चितच क्रांती घडविल्याशिवाय राहणार नाही.

15 ते 25 वयातले तुम्ही सर्व पोरं-पोरी! परंतु प्रचंड बुद्धिमत्ता, अफाट कौशल्य, आधुनिक जगाचा अभ्यास, नवीन तंत्रज्ञानाची माहिती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुमची भन्नाट कल्पकता! त्यासमोर तर नतमस्तकच व्हावे लागते. प्रचंड संघर्ष आणि अंगावर लाठ्या पडत असतानाही ज्या खिलाडू वृत्तीने आणि गांधीच्या अहिंसक मार्गाने तुम्ही या सर्व हुकूमशाहीला सामोरे गेलात त्यावरून गांधी आणि आंबेडकर हेच येणाऱ्या काळात या देशाचे आयकॉन राहतील हे आता तुम्ही सिद्ध केले आहे. गोडसे आणि गोळवलकर यांना कोणी कितीही समोर आणण्याचा प्रयत्न केला तरी ते या देशाच्या तरुण पिढीचे आदर्श असूच शकत नाही हे तुमच्या आंदोलनाने दाखवून दिले. 21 विद्यार्थ्यांचे बलिदान व्यर्थ जाऊ न देता तुम्ही त्यांच्यासाठी जो घनघोर संघर्ष केला तो इतिहासाच्या पानापानावर कोरल्या जाईल.



प्रेमकुमार बोके
9527912706

पोरांनो, तुम्ही जी क्रांती केली, ती सध्याच्या काळात इतकी सोपी, सहज आणि सरळ नव्हती. सध्याची सत्ता ही क्रूर, कपटी, उन्मत्त, गर्विष्ठ, अहंकारी, संवेदनाहीन, माणुसकीहीन आणि सामान्य माणसाला किड्यामुंग्यासारखी समजणारी आहे. एका माणसाच्या राजहट्टासाठी या धर्मांध लोकांनी महान लोकशाहीचा गळा घोटलेला आहे. त्यामुळेच प्रत्येक जण तुम्हाला प्रेमाने समजावून सांगत होता की, या तानाशाही प्रवृत्तीच्या सत्तेसमोर तुमचे काही चालणार नाही. तुम्ही सर्वांचे शांतपणे ऐकून तर घेतले, पण काम मात्र स्वतःच्या मेंदूने केले आणि त्यामुळेच तुमचा विजय झाला.

तल्लख बुद्धीच्या पोरांनो, देश सध्या अत्यंत भीषण परिस्थितीतून वाटचाल करीत आहे. खऱ्या स्वातंत्र्यवीरांचे बलिदान विसरायला लावून इंग्रजांसमोर माफीनामे देणाऱ्या लोकांचा उदो उदो देशात सुरू आहे. त्यामुळे तुमची जबाबदारी आणखी वाढलेली आहे. इतिहासाची चिकित्सा करून सत्य इतिहास जगासमोर आणणे आणि भारताला महासत्ता बनवणे यासाठी तुमचा पुढील संघर्ष असला पाहिजे. देशात तुम्ही पेटवलेली क्रांतीची आग वणवा बनून निश्चितच परिवर्तन घडवून आणेल आणि या देशाची लोकशाही पुन्हा एकदा नव्या तेजाने उजळून येईल अशी आम्हाला आशा आहे. त्यासाठी तुमचा आजचा संघर्ष कारणीभूत ठरेल. हुशार पोरांनो, तुम्हीच खरे या देशाचे भविष्य, आधारस्तंभ आणि येणाऱ्या काळातील आयकॉन आहात. तुमच्या संघर्षाला मनापासून सलाम!●●

## परिक्षा

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

शाळा, कॉलेज जरी सुटले तरी आयुष्याच्या महाविद्यालयाच्या परिक्षा मात्र अखेरच्या श्वासा पर्यंत द्याव्या लागतात . ह्या परिक्षेत कॉपी चालत नाही , शिफारसीला वाव नसतो. पेपरफुटीचा तर प्रश्नच येत नाही. कधीकधी आपला पुर्ण अभ्यास झाला आहे ह्याची खात्री वाटते पण नेमका त्याचवेळी अभ्यासक्रम बदललेला असतो. ह्या परिक्षांचा कालावधी कधी संपतो आणि कधी सुरू होतो ह्याची कुणालाही पुर्व कल्पना नसते. म्हणुन त्यासाठी वेळेचे भान महत्वाचे असते. वेळ फार अमुल्य असल्याने तो कुणाला किती द्यावा ह्याची समज फार उपयुक्त ठरते. ‘ जो करना हैं, आज कर लो, कल तो खुद कल के इंतज़ार में हैं ‘ म्हणून फक्त विचार करू नका , सुरुवात करा .फक्त कबुल करू नका , करून दाखवा. फक्त बोलू नका, सिद्ध करा. तरच ह्या परिक्षेत यश मिळेल. हा अनुभव कुणालाही वयानुसार मिळत नाही तर परिस्थितीनूसार मिळतो . असं म्हणतात की यशाला कोणताही शॉर्टकट नसतो पण ह्या परिक्षेत यश मिळवायचा शॉर्टकट म्हणजे स्वतःवरचा विश्वास. परिक्षेत उत्तम गुण मिळवण्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवाव्या. ‘ जिवन में जिसे निभा ना सके, वो वादा ना करें, बातें कभी खुद के स्तर सें, ज्यादा ना करें, भलेही तमन्ना रखें आसमान छू लेने की , लेकिन औरों को गिराने का , इरादा ना रखे ‘ ●●

# अखेर सरकारला झुकावे लागले !

## संघटित विद्यार्थी आंदोलन, लोकशाही आणि संविधानाची ताकद

‘कहते थे इस सरकार में इस्तीफे नहीं होते’ अशी राजकीय चर्चा अनेकदा ऐकायला मिळत होती. मात्र शिक्षण व्यवस्थेतील कथित अनियमितता, परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकतेची मागणी आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर उभारलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर या चर्चेला नवे वळण मिळाले. आंदोलनात सहभागी कार्यकर्त्यांच्या मते, हा संघर्ष लोकशाही पद्धतीने जनमत निर्माण करण्याचा आणि सरकारला उत्तरदायी धरण्याचा महत्त्वाचा टप्पा ठरला. बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते, ‘शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे; ते जो प्राशन करेल, तो डरकाळी फोडल्याशिवाय राहणार नाही.’ शिक्षण माणसाला प्रश्न विचारण्याची ताकद देते, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य देते आणि संविधानिक मार्गाने संघर्ष करण्याची प्रेरणा देते. या आंदोलनाकडे पाहताना अनेकांना डॉ. बाबासाहेबांच्या या विचारांची आठवण झाली. अभिजीत दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शिक्षणव्यवस्थेतील प्रश्न, परीक्षा प्रक्रियेतील कथित गैरव्यवहार आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याबाबत सातत्याने आवाज उठवला. सोशल मीडियाच्या माध्यमातून सुरू झालेली कॉकरोच जनता पार्टी (CJP) ही मोहीम पुढे विद्यार्थी, युवक आणि विविध सामाजिक घटकांना एकत्र आणणाऱ्या व्यापक आंदोलनात परिवर्तित झाली. जंतर-मंतरवरील आंदोलनामुळे देशभरात शिक्षणव्यवस्थेवरील चर्चा अधिक तीव्र झाली. या आंदोलनात अभिजीत दीपके यांच्यासोबत आशुतोष रांका, सौरव दास, त्यांच्या सहकाऱ्यांची टीम, विविध विद्यापीठांतील विद्यार्थी आणि अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. विशेषतः जेएनयूसह विविध शैक्षणिक संस्थांतील विद्यार्थ्यांनी या आंदोलनात मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. आंदोलनकर्त्यांच्या मते, हा संघर्ष कोणत्याही एका व्यक्तीचा नसून हजारो विद्यार्थ्यांच्या आशा, अपेक्षा आणि भविष्याचा होता. पर्यावरणवादी आणि शिक्षण सुधारणा चळवळीतील कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनीही या आंदोलनाला नैतिक पाठिंबा दिला. त्यांच्या उपोषणामुळे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे देशाचे लक्ष वेधले गेले, असे अनेक आंदोलनकर्त्यांचे मत आहे. आंदोलनाचा केंद्रबिंदू केवळ एका मंत्र्याचा राजीनामा नव्हता, तर परीक्षा व्यवस्थेतील




पारदर्शकता, विद्यार्थ्यांच्या हितांचे संरक्षण आणि उत्तरदायित्व निश्चित करणे हा होता. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर अभिजीत दीपके यांनी सामाजिक माध्यमांवर व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया चर्चेचा विषय ठरल्या. त्यांनी सुरुवातीला संघर्षाच्या यशाचा आनंद व्यक्त करत लोकशाहीच्या विजयाचा उल्लेख केला. मात्र त्यानंतर त्यांनी केलेले विधान अधिक महत्त्वाचे मानले गेले. ते म्हणाले, ‘धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यामुळे मला हिरो बनवू नका. एकाच माणसाला हिरो बनविण्याच्या सवयीमुळे देशाचे नुकसान झाले आहे. व्यक्तीपेक्षा संविधान आणि लोकशाही मोठी आहे.’ या विधानातून व्यक्तिपूजेऐवजी संविधान आणि सामूहिक नेतृत्वावर त्यांनी दिलेला भर स्पष्टपणे दिसून येतो. लोकशाहीत कोणताही बदल एका व्यक्तीमुळे होत नाही; तो जनतेच्या संघटित प्रयत्नांमुळे, सातत्यपूर्ण संघर्षामुळे आणि संविधानिक मार्गाने उभारलेल्या जनमतामुळे घडतो, हा संदेश या भूमिकेतून अधोरेखित झाला. आंदोलनादरम्यान अभिजीत दीपके यांना टायफॉइडची लागण झाली होती, तरीही त्यांनी संघर्ष सोडला नाही, असा दावा आंदोलनकर्त्यांनी केला आहे. प्रकृती ठीक नसतानाही ते आंदोलनाच्या केंद्रस्थानी राहिले. त्यांच्या या चिकाटीमुळे अनेक युवकांना प्रेरणा मिळाल्याचे कार्यकर्ते सांगतात. या संपूर्ण आंदोलनाने भारतीय लोकशाहीबाबत एक महत्त्वाचा संदेश दिला. संविधानाने प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण आंदोलनाचा, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आणि सरकारला प्रश्न विचारण्याचा अधिकार दिला आहे. लोकशाहीची खरी ताकद निवडणुकांपुरती मर्यादित नसून नागरिकांच्या सततच्या सहभागात आहे. जनतेने संघटितपणे, अहिंसक मार्गाने आणि कायद्याच्या चौकटीत राहून प्रश्न मांडले, तर सरकारलाही त्याकडे लक्ष द्यावे लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आज आपल्यात नसले, तरी त्यांनी दिलेले संविधान आजही प्रत्येक नागरिकाला समान अधिकार, न्याय आणि स्वातंत्र्याची हमी देते. संविधान हा केवळ कायद्यांचा ग्रंथ नसून लोकशाहीचा आत्मा आहे. त्यामुळे कोणत्याही संघर्षाचे अंतिम ध्येय व्यक्तीपूजा नसून संविधानिक मूल्यांचे रक्षण असले पाहिजे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आंदोलनाचा एक टप्पा पूर्ण झाला असला, तरी शिक्षणव्यवस्थेतील सुधारणा, परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता, विद्यार्थ्यांना न्याय आणि उत्तरदायी प्रशासन या प्रश्नांवरील काम अद्याप बाकी आहे. त्यामुळे हा संघर्ष संपला नसून पुढील टप्प्यात प्रवेश केला आहे, अशी भावना आंदोलनात सहभागी असलेल्या अनेकांनी व्यक्त केली आहे. या आंदोलनात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थी, युवक, सामाजिक कार्यकर्ते आणि संविधानवादी नागरिकांचे योगदान महत्त्वाचे आहे. कोणत्याही लोकशाहीत जनतेचा जागरूक सहभाग हीच तिची सर्वात मोठी ताकद असते. शिक्षण, न्याय, समान संधी आणि पारदर्शक व्यवस्था या मूल्यांसाठी उभा राहणारा प्रत्येक नागरिक लोकशाही अधिक मजबूत करतो. संघर्षाची खरी ताकद व्यक्तीमध्ये नसते; ती विचारांमध्ये, संविधानावर असलेल्या विश्वासात आणि संघटित जनशक्तीत असते. हाच या आंदोलनाचा सर्वात मोठा संदेश मानला जाऊ शकतो.●●



आर. के. जुमळे
93264 50506

# बळीराज्याच्या बैलांना, रेशीमबागच्या अंधश्रद्धाळू, परंपरावादी शेतात जुंपू नका!

भारत हा पुरोगामी, मानवी समता आणि मानवतावादी संस्कृतीच्या आदर्शांनी सजलेला देश आहे. भगवान बुद्ध, सम्राट अशोक, कबीर, गुरुनानक, संत रविदास, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत चोखामेळा, सावता माळी, गोरा कुंभार, जगनाडे महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, रमाई, बिरसा मुंडा, अण्णाभाऊ साठे, लहुजी साळवे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रसंत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, मा. कांशीराम, पैगंबर मोहम्मद आणि येशू ख्रिस्त यांसारख्या महापुरुषांच्या शांती, समता आणि संविधानिक मूल्यांवर उभी असलेली ही मानवतावादी इमारत टिकवून ठेवण्याची जबाबदारी भारतातील सर्व नागरिकांवर आहे. जे स्वतःला ओबीसी विचारवंत किंवा परिवर्तनवादी म्हणवतात, त्यांनी विदेशी वैदिक मनुवादी विचारसरणीचा प्रभाव नाकारून वास्तव इतिहासाचा अभ्यास करावा. अंधभक्ती सोडून सत्य स्वीकारण्याची गरज आहे. बळीराजा हा दुसरा कोणी नसून भारतातील मूळ निवासी, कृषिप्रधान संस्कृतीचा प्रतिनिधी आणि शेतकरी समाजाचा प्रतिक आहे, हे समजून घेतले पाहिजे. भक्ती करावी; पण ती विवेकबुद्धीला पटेल अशी असावी. दैववादापेक्षा स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला पाहिजे. लेखकाच्या मते, अनेक प्राचीन बौद्ध विहारांचे कालांतराने मंदिरांमध्ये रूपांतर झाले आणि त्यातून अंधश्रद्धेला खतपाणी घालण्यात आले. या प्रक्रियेचा वस्तुनिष्ठ अभ्यास करून समाजाने इतिहासाची चिकित्सा करणे आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ हिंदवी स्वराज्याचे नव्हे, तर मानवी स्वराज्याचेही पुरस्कर्ते होते, अशी भूमिका लेखक मांडतो. तसेच भगवान बुद्ध हे देव नसून जगातील पहिले मानवतावादी विचारवंत आणि समाजमार्गदर्शक होते, असे तो प्रतिपादन करतो. 'क्षत्रिय' या शब्दाचा अर्थ 'ज्या क्षेत्राचे जे राजे, ते त्या क्षेत्राचे क्षत्रिय' असा होतो. महार, मांग, चांभार, मेहतर, कोळी, कोष्टी, लोहार, सोनार, सुतार, माळी, धोबी, ढिवर अशा विविध समाजघटकांचे पारंपरिक व्यवसाय



हे शेतीपूरक होते. त्यामुळे हे सर्व बळीराजाची लेकरे आणि कृषिप्रधान भारताचे वारसदार आहेत, असे लेखकाचे मत आहे. लेखकाच्या मते, विदेशी वैदिक मनुवादी व्यवस्थेने मूळ निवासी समाजाला 'शूद्र' म्हणून संबोधून त्यांचा इतिहास दडपला. पेशवाई काळात शिक्षणबंदी आणि अर्थार्जनावर निर्बंध घालण्यात आले. त्याचे दुष्परिणाम आजही शेतकरी समाजाला भोगावे लागत असून, कर्जबाजारीपणा आणि आत्महत्यांसारख्या समस्या त्यातून निर्माण झाल्या आहेत. भगवान बुद्धांपासून सर्व संत-महापुरुषांपर्यंत सर्वांचे या मातृभूमीशी जिव्हाळ्याचे नाते आहे. आपण सर्व भारतीय समान हक्काचे नागरिक आहोत, ही भावना दृढ व्हावी. भारतात जातिभेदमुक्त, मानवतावादी समाज निर्माण व्हावा, हाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीमागील मूलभूत उद्देश होता, असे लेखक नमूद करतो. लेखकाच्या मते, अज्ञानामुळे काही लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांपेक्षा त्यांच्या जातीकडे पाहिले, ही भारताच्या अधोगतीस कारणीभूत ठरलेली मोठी चूक आहे. भारताचे उज्ज्वल भविष्य घडवायचे असेल, तर अंधश्रद्धा, काल्पनिक कथा आणि अवैज्ञानिक समजुती सोडून वास्तव, विवेक आणि सत्याच्या मार्गाने आचरण करणे आवश्यक आहे.●●



अनिरुद्ध शेवाळे
9823368332

## वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

### २५ जुलैचा अंक खरोखरच लय भारी!

२५ जुलैचा अंक अत्यंत उत्कृष्ट झाला आहे. सर्व लेखकांचे अभ्यासपूर्ण लेख मी पूर्ण वाचले. सर्वप्रथम आपले मनःपूर्वक अभिनंदन! कारण आपण आजच्या मनुवादी व्यवस्थेविरोधात वृत्तपत्राच्या माध्यमातून मानवी समाजात समता, परिवर्तनवादी विचार आणि प्रबोधनाचे कार्य अत्यंत खंबीरपणे करीत आहात. यासाठी आपले मनःपूर्वक अभिनंदन. लेखक आनंद म्हस्के यांनी बौद्धांनी पंढरीच्या वारीत का सहभागी व्हावे? हा इतिहासातील दाखल्यांसह अभ्यासपूर्ण लेख वाचकांसमोर मांडला आहे. दीपक गायकवाड सरांनी बुद्ध, विठ्ठल आणि संत तुकाराम या विषयावर इतिहासातील संदर्भ आणि संतवाणीतील ओळींच्या आधारे सिंधू संस्कृती व बौद्ध वैचारिकतेचा परखड उलगडा केला आहे. ॲड. सिद्धार्थ कांबळे सरांनी ₹आता देशाला भाजपची आवश्यकता नाही₹ या लेखातून लोकशाही, भारतीय संविधानातील तत्त्वे, नागरिकांचे अधिकार आणि सत्ताधाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांवर अत्यंत सखोल व प्रभावी भाष्य केले आहे. जयंत रामटेके सरांनीही अत्यंत महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. हे आंदोलन केवळ धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यापुरते मर्यादित नसून, व्यवस्थेविरोधात आणि भाजप-आरएसएसच्या वैचारिकतेविरोधात आहे, हे त्यांनी ठामपणे स्पष्ट केले आहे. हा विषय माझ्याही विचारांशी सुसंगत आहे. भूपेंद्र गणवीर यांनी बदलत्या राजकीय परिस्थितीची चाहूल देणारे प्रभावी विश्लेषण केले आहे. तर ज्ञानेश्वरजी रक्षक यांनी वारकरी आणि वारीचा खरा अर्थ अत्यंत समर्पकपणे उलगडून सांगितला आहे. आज सर्वच लेखकांचे लेख वाचल्यानंतर माझे मत व्यक्त केल्याशिवाय राहवले नाही. दैनिक बहुजन सौरभ हे केवळ एक वृत्तपत्र नसून इतिहास, सामाजिक परिवर्तन आणि प्रबोधन शिकवणारे एक वैचारिक विद्यापीठ आहे. आणि त्या विद्यापीठाच्या कुलगुरू म्हणजे संध्याताई राजूरकर. ज्या जशा परीक्षेची प्रश्नपत्रिका पेपरफुटी होऊ न देता सुरक्षितपणे विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांपर्यंत पोहोचवतात, त्याचप्रमाणे त्या सत्य, विचार आणि परिवर्तनाची वैचारिक प्रश्नपत्रिका समाजापर्यंत प्रामाणिकपणे पोहोचवत आहेत. मनःपूर्वक धन्यवाद! डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेवटपर्यंत विद्यार्थी म्हणूनच जगले; म्हणूनच ते आजही संपूर्ण मानवजातीचे प्रेरणास्थान आहेत.●●

– अनिरूद्ध शेवाळे

### दै.बहुजन सौरभ खरोखर धन्यवादास पात्र...

दि. १७ जुलै २०२६, दै.बहुजन सौरभ मधील संपादकीय अग्रलेख “सोनम वांगचूक विरूद्ध राहुल गांधी? की खरा संघर्ष केंद्र सरकारशी” आवडला. त्या संपादकीय मधील,”सोनम वांगचूक यांनी उपस्थित केलेले प्रश्न योग्य आहेत का, यावर देशाने चर्चा केली पाहिजे.” हा विचार जास्त आवडला. याविषया संदर्भात सगळ्यात जास्त तथाकथित पुरोगामी मीडिया पत्रकारांनी या देशाला भ्रमित करण्याचे काम केले आहे. अशा वेळी दै.बहुजन सौरभ खरोखर धन्यवादास पात्र आहे, कारण योग्य विचार जनतेपर्यंत पोहचविला आहे. अण्णा हजारेंची प्रसिद्धी करणारी मंडळी वांगचूक हा बीजेपीचा माणूस आहे, असे सांगत सुटले, तर बीजेपींचे नेते म्हणतात, तो केजरीवालचा माणूस आहे. काँग्रेसचे मीडिया प्रमुख म्हणतात, त्यांचे आंदोलन केंद्रीय शिक्षणमंत्र्याच्या राजीनाम्यासाठी आहे, त्यामुळे सोनम वांगचूकचा लढा कोणत्याच अर्थाने काँग्रेस विरूद्ध नाही. परंतु राहुल गांधी यांना भिती आहे, की जर पुढे राजकीय पार्टी म्हणून सीजेपी जर वाढली, तर काँग्रेसचे नुकसान होईल. ही भिती निराधार आहे.●●

–पुरूषोत्तम संबोधी

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात तरुणांनी वेळोवेळी परिवर्तनाची दिशा ठरवली आहे. स्वातंत्र्यलढा, सामाजिक सुधारणा, विद्यार्थी आंदोलने आणि लोकशाही हक्कांच्या चळवळी यामध्ये तरुणाईने नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावली. आजच्या डिजिटल युगातही ही परंपरा कायम असल्याचे दिसून येते. शिक्षणव्यवस्थेतील अनियमितता, स्पर्धा परीक्षांतील कथित गैरव्यवहार आणि बेरोजगारीच्या प्रश्नांवर देशभरात व्यक्त झालेल्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर अभिजित दिपके हे नाव चर्चेत आले. अनेक तरुणांच्या दृष्टीने ते संघर्ष, संघटन आणि लोकशाही मार्गाने आवाज उठविण्याचे प्रतिक बनले.

कोणतीही चळवळ एका दिवसात घडत नाही. तिच्यामागे समाजातील अस्वस्थता, प्रश्न आणि बदलाची इच्छा दडलेली असते. गेल्या काही वर्षांत स्पर्धा परीक्षांबाबत निर्माण झालेले वाद, परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत उपस्थित होणारे प्रश्न आणि रोजगाराच्या मर्यादित संधी यामुळे तरुणांमध्ये नाराजी वाढत होती. या नाराजीला संघटित स्वरूप देण्याचे काम काही तरुण कार्यकर्त्यांनी केले. त्यात अभिजित दिपके यांचे नाव विशेषत्वाने पुढे आले. कॉकरोच जनता पार्टी (CJP) या नावाने सुरू झालेल्या आंदोलनाने सुरुवातीला उपरोध, व्यंग आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली भूमिका मांडली. या नावामागील संदेश असा मांडला गेला की सामान्य नागरिक आणि विद्यार्थी यांना कितीही दडपण्याचा प्रयत्न झाला तरी ते पुन्हा उभे राहतात. सोशल मीडियाच्या युगात ही शैली अनेक तरुणांना भावली आणि आंदोलनाला देशभरातून प्रतिसाद मिळू लागला.

दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलनाला वेग आला. हजारो विद्यार्थी, युवक आणि विविध राज्यांतील नागरिक या आंदोलनात सहभागी झाले. आंदोलनकर्त्यांनी शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा, परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली. आंदोलनादरम्यान अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांनीही पाठिंबा व्यक्त केला. त्यामुळे ही चळवळ केवळ एका गटापुरती मर्यादित न राहता व्यापक चर्चेचा विषय ठरली.

अभिजित दिपके यांच्या नेतृत्वाची चर्चा याच काळात अधिक झाली. आंदोलनादरम्यान त्यांनी सातत्याने संवाद साधण्याचा प्रयत्न केला. सोशल मीडिया, पत्रकार परिषद आणि सार्वजनिक सभांमधून त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. अनेक समर्थकांच्या मते, त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे व्यक्तिपूजेपेक्षा सामूहिक नेतृत्वावर त्यांनी भर दिला. आंदोलनात सहभागी असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याचे योगदान महत्त्वाचे असल्याचे ते वारंवार सांगत होते.

# अभिजीत दिपके : एक क्रांतीसूत




लोकशाहीमध्ये आंदोलन हा संविधानाने मान्य केलेला मार्ग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानिक आणि शांततामय संघर्षाला महत्त्व दिले होते. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज आणि इतर समाजसुधारकांनीही शिक्षण, संघटन आणि जनजागृती यांना परिवर्तनाची साधने मानले. त्यामुळे कोणतेही आंदोलन संविधानाच्या चौकटीत, शांततेने आणि कायद्याचा आदर राखून झाले, तर ते लोकशाही अधिक मजबूत करण्यास मदत करते. आंदोलनादरम्यान पोलिसांशी झालेल्या संघर्षाच्या घटनाही समोर आल्या. काही ठिकाणी लाठीचार्ज आणि अश्रुधुराचा वापर झाल्याच्या बातम्या चर्चेत राहिल्या. याबाबत विविध दावे आणि प्रतिदावे करण्यात आले. अशा परिस्थितीत वस्तुस्थिती समोर येण्यासाठी निष्पक्ष चौकशी आणि कायदेशीर प्रक्रिया महत्त्वाची असते. लोकशाहीत कोणत्याही पक्षाचा किंवा संस्थेचा निर्णय हा पुरावे आणि कायद्याच्या आधारेच व्हायला हवा. या आंदोलनाशी संबंधित आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे सोशल मीडियाची भूमिका. पूर्वी आंदोलने संघटनांच्या माध्यमातून हळूहळू वाढत असत; आज मात्र काही तासांतच देशभरातील लाखो लोकांपर्यंत माहिती पोहोचते. यामुळे जनमत तयार होण्याचा वेग वाढला आहे. मात्र याचबरोबर चुकीची माहिती, अपूर्ण माहिती किंवा अफवा पसरू नयेत, याची जबाबदारीही प्रत्येक नागरिकावर आहे. त्यामुळे कोणतीही माहिती स्वीकारण्यापूर्वी तिची पडताळणी करणे आवश्यक ठरते. अभिजित दिपके यांच्या संदर्भात त्यांच्या समर्थकांनी आणखी एक मुद्दा अधोरेखित केला तो म्हणजे संघर्षातील सातत्य. आजारपणाची अडचण असतानाही त्यांनी आंदोलनात सहभाग कायम ठेवला, असे अनेकांनी नमूद केले. समर्थकांच्या मते, ही बाब त्यांच्या चिकाटीचे उदाहरण आहे. नेतृत्व म्हणजे केवळ भाषण करणे नव्हे, तर संकटातही सहकाऱ्यांसोबत उभे राहणे, हा संदेश त्यांच्या भूमिकेतून दिसून आला.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षणव्यवस्थेतील सुधारणा, विद्यार्थ्यांचा सरकारवरील विश्वास आणि प्रशासनाची उत्तरदायित्वाची भावना यावर व्यापक चर्चा सुरू झाली. कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत सरकारवर प्रश्न विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे, तसेच त्या प्रश्नांना उत्तर देणे ही शासनाची जबाबदारी आहे. यामुळेच लोकशाही सशक्त राहते. तथापि, कोणत्याही आंदोलनाचे मूल्यमापन करताना भावनेपेक्षा तथ्यांना महत्त्व दिले पाहिजे. एखाद्या आंदोलनामुळे घडलेल्या सर्व राजकीय किंवा प्रशासकीय निर्णयांचे कारण एकच होते, असा निष्कर्ष पुराव्यांशिवाय काढता येत नाही. विविध घटनांमागे अनेक घटक कार्यरत असू शकतात. म्हणून इतिहासाचे मूल्यमापन करताना संयम, वस्तुनिष्ठता आणि पुराव्यांचा आधार आवश्यक असतो. आजची भारतीय तरुणाई अधिक जागरूक, तंत्रज्ञानस्नेही आणि प्रश्न विचारणारी आहे. रोजगार, शिक्षण, समान संधी आणि पारदर्शक प्रशासन या तिच्या प्रमुख अपेक्षा आहेत. या अपेक्षांकडे दुर्लक्ष केल्यास असंतोष वाढू शकतो; परंतु त्यावरचा उपाय संघर्ष आणि संवाद या दोन्हींच्या संतुलनात आहे. लोकशाहीमध्ये विरोध हा शत्रुत्व नसून उत्तरदायित्वाची आठवण असते. अभिजित दिपके यांच्याविषयी कोणाचीही राजकीय भूमिका असो, त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणण्यात भूमिका बजावली, असे त्यांच्या समर्थकांचे मत आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे अनेक तरुण सार्वजनिक प्रश्नांवर बोलू लागले, संघटित होऊ लागले आणि संविधानिक मार्गाने आपली भूमिका मांडण्यास प्रेरित झाले, अशी भावना आंदोलनात सहभागी झालेल्या अनेकांनी व्यक्त केली आहे. भारतीय लोकशाहीचे खरे बळ हे जागरूक नागरिक, उत्तरदायी शासन आणि संविधानावर असलेला विश्वास यात आहे. शिक्षण, समता, न्याय आणि पारदर्शकता ही मूल्ये जपली गेली तरच देशाचा विकास अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक होईल. संघर्षाचा अंतिम उद्देश सत्तेचा पराभव नसून व्यवस्था अधिक न्याय्य, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख बनवणे हा असला पाहिजे. हाच संदेश या संपूर्ण घडामोडीतून पुढे येतो.●●



दीपक गायकवाड
मो. 97650 46493

28 July 2026 page 044_Layout 1 27-07-2026 06:32 PM Page 1



# आरक्षण दिनानिमित्त काष्ट्राईबचा परिसंवाद व अरुण गाडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण





**नागपूर :** महाराष्ट्र राज्य काष्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने आरक्षण दिनानिमित्त 'आरक्षणाचे संवैधानिक महत्त्व आणि सामाजिक न्याय' या विषयावर परिसंवाद तसेच महासंघाचे अध्यक्ष अरुण गाडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम उपसंचालक, आरोग्य विभाग, नागपूर कार्यालयातील सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण सभागृहात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निवृत्ती राठोड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केला होता. कार्यक्रमाला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे, राष्ट्रीय संयुक्त मोर्चाचे राष्ट्रीय महासचिव प्रा. रमेश पिशे, भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय समन्वयक इंजि. पद्माकर गणवीर, दै. बहुजन सौरभच्या निवासी संपादक संध्या राजूरकर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय भंडारा येथील अधिष्ठाता डॉ. नारायण सूर्यवंशी, ज्येष्ठ कवी शालिक जिल्हेकर, खेमराज भोयर व हृदय चक्रधर श्यामराव हाडके यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात डॉ. निवृत्ती राठोड यांनी अरुण गाडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित वृक्षारोपण उपक्रमाचे कौतुक करतांना, 'काष्ट्राईब महासंघ कर्मचारी प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने कार्यरत असून सामाजिक बांधिलकी जपत सामाजिक न्यायासाठीही महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. महासंघाने राष्ट्रीय आरोग्य अभियानाशी संबंधित जनजागृती कार्यक्रम राज्यभर राबवून केंद्र सरकारच्या आरोग्य योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवावा. शासनाकडून त्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल,' असे प्रतिपादन केले. यावेळी प्रा. रमेश पिशे, संध्या राजूरकर, इंजि. पद्माकर गणवीर, कवी हृदय चक्रधर श्यामराव हाडके आदी मान्यवरांनी आरक्षणाचे संवैधानिक महत्त्व, सामाजिक न्याय आणि पर्यावरण संवर्धन या विषयांवर मार्गदर्शन केले. यानंतर डॉ. अविनाश गावंडे, डॉ. नारायण सूर्यवंशी, प्रा. रमेश पिशे तसेच काष्ट्राईब महासंघाच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण केले. कार्यक्रमास कवी हृदय चक्रधर, संजय ठाकूर, मिलिंद लोणारे, संजय तायडे, राजेश ढेंगरे, मुकुंद मेंढे, संजय मून, डॉ. बहादुरे, स्वाती इवनाते, नागेश वाहूरवाघ, अॅड. बाबुलाल वाघमारे, कैलास खोंडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन थुल यांनी केले, संचालन सीताराम राठोड यांनी केले, तर आभार प्रदर्शन रवि पोथारे यांनी मानले.

### डोळ्यांवर पट्टी, ४८ सेकंदांत ६० मार्बल्स वर्गीकृत

# युगांतची विश्वविक्रमाला गवसणी 'वंडर किड् ऑफ द वर्ल्ड' पुरस्काराने गौरव



**नागपूर :** अवघ्या ९ वर्षांच्या युगांत भुमेश वंजारी या विद्यार्थ्याने असामान्य एकाग्रता, स्मरणशक्ती आणि ब्लाइंडफोल्ड कौशल्याच्या जोरावर विश्वविक्रमाची नोंद करून नागपूरचे नाव जागतिक स्तरावर उज्ज्वल केले आहे.

बेसा-घोगली येथील माउंट लिटेरा झी स्कूलमध्ये चौथी इयत्तेत शिक्षण घेणाऱ्या युगांतने इंडियन वर्ल्ड रेकॉर्ड फेडरेशन (IWRF) आयोजित स्पर्धेत हा विक्रम प्रस्थापित केला. 'यंगेस्ट अँड फास्टेस्ट टू सॉर्ट मॅक्सिमम नंबर ऑफ मल्टीकलर्ड मार्बल्स इंटू फाइव्ह कंटेनर्स व्हाईल ब्लाइंडफोल्डेड' या प्रकारात त्याने डोळ्यांवर पट्टी बांधून अवघ्या ४८ सेकंदांत ६० विविध रंगांचे मार्बल्स अचूकपणे पाच स्वतंत्र पात्रांमध्ये वर्गीकृत केले.

या उल्लेखनीय कामगिरीची नोंद विश्वविक्रम म्हणून करण्यात आली असून, इंडियन वर्ल्ड रेकॉर्ड फेडरेशनतर्फे युगांतला अधिकृत विश्वविक्रम प्रमाणपत्र आणि प्रतिष्ठेचा 'वंडर किड् ऑफ द वर्ल्ड' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

युगांतच्या या यशाबद्दल नितीन गडकरी यांनी त्याचे अभिनंदन केले. या यशामागे डॉ. किरण काकडे यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरल्याचे सांगण्यात आले. किरण मिडब्रेन अकादमीतील प्रशिक्षणामुळे युगांतची एकाग्रता, स्मरणशक्ती, संवेदनक्षमता आणि ब्लाइंडफोल्ड कौशल्य विकसित झाल्याचे नमूद करण्यात आले.

युगांतचे वडील भुमेश वंजारी आणि आई प्रिया वंजारी यांनी मुलाची जिद्द, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि योग्य प्रशिक्षण यामुळेच हे यश मिळाल्याची भावना व्यक्त केली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे नागपूरच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, युगांतवर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# आंबेडकरी महिलांनी इतर प्रवाहातील महिलांच्या जागृतीसाठी पुढाकार घ्यावा : डॉ. संजय शेंडे

**नागपूर :** 1942 महिला परिषद समिती, संथागार फाउंडेशन व विविध महिला संघटनांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. आंबेडकर कॉन्फरन्स हॉल, उर्वेला कॉलनी येथे महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय शेंडे यांनी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महिला सक्षमीकरणातील योगदानाचा गौरव करत, आंबेडकरी महिलांनी ओबीसीसह इतर वंचित समाजातील महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. मुख्य वक्त्या प्रा. रोमा हर्षवर्धन यांनी बौद्ध धम्मातील विनय पिटक व त्रिपिटकाचे महत्त्व स्पष्ट केले. प्रा. संध्या राजुरकर, निवासी संपादक बहुजन सौरभ, यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा राजकीय वापर न करता त्यांचे तत्त्वज्ञान आत्मसात करण्याची गरज व्यक्त केली. डॉ. सरोज आगलावे यांनी 1942 च्या ऐतिहासिक महिला परिषदेचे महत्त्व आणि 2017 मधील दीक्षाभूमी येथे झालेल्या परिषदेला उजाळा दिला. डॉ. सरोज डांगे यांनी कार्यक्रमाची भूमिका मांडत महिलांच्या ज्वलंत प्रश्नांवर प्रकाश टाकला, तर सुषमा भड, अध्यक्ष, संवैधानिक ओबीसी महिला संघ, यांनी महिलांच्या प्रगतीतूनच देशाची प्रगती होते, हा डॉ. आंबेडकरांचा विचार अधोरेखित केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एम. एस. शाक्य जांभुळे, सूत्रसंचालन प्रा. माधुरी गायधने यांनी, तर आभार प्रदर्शन सुनंदा रायपूरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मंगला जांभुळे, प्रा. पुष्पा सोमकुवर, नंदा पंचभाई, जया कालिहारी, संध्या वारके, वंदना धनविजय, ज्योत्स्ना बनसोड, प्रीती तिरपुडे, दर्शना मेश्राम, यशोधरा फुलझेले, सुनीता रामटेके आणि इंजी. विजया मडके यांनी सहकार्य केले.

## महत्वाचे



### मंडल यात्रेच्या गोंदिया स्वागतासाठी नियोजन बैठक

**गोंदिया :** सकल ओबीसी महामोर्चा व समविचारी ओबीसी संघटनांच्या वतीने ३ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या 'मंडल यात्रे'च्या गोंदिया जिल्ह्यातील स्वागतासाठी रविवारी शासकीय विश्रामगृहात नियोजन बैठक झाली. अध्यक्षस्थानी संयोजक उमेश कोराम होते. बैठकीत ७ ऑगस्ट रोजी गोंदिया जिल्ह्यात यात्रेचे जंगी स्वागत करण्याचा तसेच नवेगाव, एकोडी, गोंदिया, गोरेगाव, आमगाव, साखरीटोला, डोंगरगाव सावली, देवरी व कोहमारा येथे स्वागत व कॉर्नर सभांचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीला ओबीसी सेवा संघ, ओबीसी महासभा, ओबीसी अधिकार मंच, शिक्षण बचाव समिती, युवा बहुजन मंच आदी विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### AIAPGET-2026 साठी इंटर्नशिपची 31 ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**नागपूर :** NIMA Students Forum Maharashtra यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर AIAPGET-2026 परीक्षेसाठी इंटर्नशिप पूर्ण करण्याची अंतिम मुदत 31 ऑगस्टऐवजी 31 ऑक्टोबर 2026 पर्यंत वाढविण्यात आली आहे. कोविड-19 मुळे प्रभावित 2020-21 बॅचच्या BAMS, BHMS व BUMS विद्यार्थ्यांना या निर्णयाचा लाभ होणार असून महाराष्ट्रातील 10 हजारांहून अधिक व देशभरातील 30 हजारांपेक्षा अधिक विद्यार्थी पात्र ठरणार आहेत. या निर्णयासाठी NIMA Students Forum Maharashtra चे अध्यक्ष डॉ. संकेत अण्णाजी झाडे, सचिव डॉ. कृष्णा चलगे, कोषाध्यक्ष डॉ. योगेश उदगीकर यांच्या नेतृत्वाखाली पाठपुरावा करण्यात आला. तसेच डॉ. आशुतोष कुलकर्णी, डॉ. टेंभुर्णीकर, डॉ. राजू ताटेवार, डॉ. प्रशांत देशमुख, डॉ. सोपान खर्चे, डॉ. गजानन पडघन, डॉ. शैलेश निकम, डॉ. रविंद्र बोथरा, डॉ. शैलेंद्र अग्रवाल, डॉ. सागर कारंडे आणि डॉ. श्रीराम रगड यांचे मार्गदर्शन लाभले.

### एस.आय.आर. कामात गोंधळात गोंधळ

**नागपूर :** देशातील सर्वच राज्यात सत्ता प्राप्त व्हावी यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा या धुरंधर जोडीने घाईघाईने पश्चिम बंगालचे राज्य काबीज करण्याकरिता एस.आय.आर.ची मोहिम राबविल्यानंतर महाराष्ट्रात लोकसभा, विधानभेच्या निवडणूकी पार पाडल्यानंतरही तडकाफडकी फर्मान काढल्यामुळे विशेष सखोल पुनर्मुल्यांकन प्रक्रियेच्या बुथ लेवल कामात गोंधळात गोंधळ उडत असून त्याचा फटका मोठ्या प्रमाणात झोपडपट्टीवासी मतदारांना बसत असल्याचा आरोप रिप. जन मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष व आम्ही सारे भारतीयचे समर्थक लाँग मार्च नेता पँथर अॅड. सुरेश घाटे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे बोचक टीका केली आहे.

याच पत्रकाद्वारे ते म्हणाले की, सत्ता प्राप्तीचा छुपा अजेंडा या आरएसएसचा त्यांच्या स्थापनेपासून होता. म. गांधींच्या स्वातंत्र्य आंदोलन चळवळीमुळे व त्यांच्या महानिर्वाणानंतरही सन १९५७ पर्यंत बेदखल होते. एसआयआरची पण ही त्यांच्या थिंक टँक व पॉलिटिकल विंगची देन असल्याची अॅड. घाटे यांनी नमूद केले. त्याचा फटका झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या आंबेडकरवाद्यांना बसणार.

## निधन वार्ता

### रामेश्वर ठाकरे



**नागपूर :** शिवशक्ती नगर येथील रहिवासी रामेश्वर ठाकरे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ५५ होते. त्यांच्या पश्चात कुटुंबीय व बराच मोठा परिवार आहे. सोमवार दि. २७ जुलै रोजी मानेवाडा घाट येथे अंत्यसंस्कार पार पडला.

### काशीबाई शंकरराव माटे



**नागपूर :** विश्वकर्मा नगर निवासी काशीबाई शंकरराव माटे, यांचे दि.26/7/2026 ला दिर्घ आजाराने निधन झाले. दि. 27/7/2027 ला मोक्षधाम येथे अंतिम संस्कार पार पडले. त्यांच्या पश्चात मुली, मुले, सुना, नातवंड व बराच मोठा आप्त परिवार आहे

# कोल इंडियाच्या रिहॅबिलिटेशन धोरणातील त्रुटींवर बैठक

### भुमीहिन शेतमजुरांसाठी रोजगार मागितला



**संवाद मित्र जयंत साठे, नागपूर :** आंबेडकरी जन आंदोलन, वणी विधानसभा क्षेत्राच्या वतीने आज वैभव अपार्टमेंट, ओंकार नगर, नागपूर येथे बैठक आयोजित करण्यात आली. वेस्टर्न कोलफील्ड् लिमिटेड (डब्ल्यूसीएल) प्रशासनाच्या रिहॅबिलिटेशन अँड रिसेटलमेंट पॉलिसीतील चुकीच्या धोरणामुळे ग्रामीण भागांतील प्रकल्पग्रस्त गावांमध्ये शेतमजूर व भुमीहिन वर्गात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी निर्माण झाल्याच्या विषयावर सविस्तर चर्चा झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा. घनश्याम धाबर्डे तर विशेष निमंत्रित म्हणून रिपब्लिकन पक्ष (खोब्रागडे) चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांचे पुतणे देशकबाबू खोब्रागडे, नागपूर विद्यापीठ सिनेट सदस्य प्रा. प्रशांत डेकाटे आणि आंबेडकरी जन आंदोलनाचे मुख्य संयोजक अनिल तेलंग उपस्थित होते. आंबेडकरी जन आंदोलनाचे मुख्य संयोजक अनिल तेलंग यांनी वणी नॉर्थ एरिया, वणी एरिया आणि नागपूर एरिया परिसरात मोठ्या प्रमाणात उभारल्या जाणाऱ्या कोळसा खाणींमुळे भुमीहिन शेतमजूर वर्गातील जातीसमुहांवर झालेल्या परिणामांची आणि त्यावरील उपाययोजनांची भूमिका मांडली. त्यांनी कोल इंडियाच्या रिहॅबिलिटेशन व रिसेटलमेंट पॉलिसीतील त्रुटींवर बोट ठेवून सांगितले की, कोल इंडिया कंपनीच्या अंतर्गत काम करणाऱ्या आउटसोर्सिंग कंपन्यांमध्ये निर्माण झालेला रोजगार केवळ प्रकल्पग्रस्त भुमीहिनांच्याच वाट्याला आला पाहिजे.

रिपब्लिकन पक्ष (खोब्रागडे) चे राष्ट्रीय अध्यक्ष देशकबाबू खोब्रागडे यांनी या भूमिकेला पाठिंबा देताना सांगितले की, ही भुमीहिनांच्या हक्काची लढाई सर्वांनी मिळून लढावी लागेल आणि यासाठी सर्वांनी सहकार्य केले पाहिजे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रा. घनश्याम धाबर्डे यांनी प्रतिपादन केले की, भुमीहिनांचा संघर्ष परंपरागत साधनांनी न लढता नवकाळातील बदललेले संदर्भ आणि नवीन आयुधे धारण करून लढावा लागेल. आंबेडकरी जन आंदोलनाने घेतलेली भूमिका आंबेडकरी चळवळीत नवचैतन्य निर्माण करणारी आहे. सर्वांनी ही भूमिका समजून एकत्रित बळ उभे केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

बैठकीचे संचालन करण सातपुते यांनी केले. यावेळी प्रशांत भगत, रवि ताकसांडे, संजय नगराळे, प्रा. भीमराव तामगाडगे, मुन्नाभाऊ खोब्रागडे, प्रविण पाझारे, वामन नळे, शेखर गणविर, गणपत टेकाम, सुनील सोयाम, राहुल गणविर, प्रभुदास नगराळे आदी उपस्थित होते.

### वडाचे एक झाड लावा, ५०० वर्षे पुण्य कमवा'

# सुशिला देवी सोशल वेल्फेअर फाउंडेशनचा आषाढी वारीत अनोखा जनजागृती उपक्रम




**पंढरपूर :** आषाढी वारीसाठी पंढरपुरात दाखल झालेल्या लाखो वारकऱ्यांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी सुशिला देवी सोशल वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने 'वडाचे एक झाड लावा, ५०० वर्षे पुण्य कमवा' या अभिनव उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. संस्थेचे संस्थापक संतोष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून, वारकरी परंपरेला पर्यावरण संरक्षणाची जोड देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. संस्थेच्या वतीने वारकऱ्यांना आवाहन करण्यात आले की, ज्या निःस्वार्थ भावनेने वारीची परंपरा शतकानुशतके जपली गेली, त्याच भावनेने निसर्गाचेही जतन करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. पुढील पिढ्यांना समृद्ध पर्यावरण देण्यासाठी प्रत्येकाने आयुष्यात किमान एक दीर्घायुषी वडाचे झाड लावून त्याचे संगोपन करावे, असा संदेश देण्यात आला. संस्थेच्या माहितीनुसार, वडाचे झाड शेकडो वर्षे टिकून राहते आणि मधमाशा, फुलपाखरे, चिमण्या, पोपट, कावळे, कोकिळा, खारुताई तसेच इतर अनेक पक्षी व प्राण्यांसाठी नैसर्गिक अधिवास निर्माण करते. त्यामुळे प्रत्येक गावात किंवा शहरात स्थानिक पातळीवर सुरक्षित जागा निश्चित करून अशा झाडांची लागवड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्वतःची जागा नसलेल्या नागरिकांनी कुंडी, पिशवी किंवा रिकाम्या डब्यात वडाची रोपे तयार करून ती वाढदिवस, विवाह समारंभ किंवा विविध सामाजिक कार्यक्रमांमध्ये भेटवस्तू म्हणून द्यावीत. तसेच सार्वजनिक जागा, वनविभाग अथवा पडिक जमिनीवर संबंधितांची परवानगी घेऊन त्यांची लागवड करावी, असेही संस्थेने सुचविले आहे. 'निसर्गाचे रक्षण हीच खरी ईश्वरसेवा आहे. वडाचे झाड लावून ते जगविणे म्हणजे पुढील अनेक पिढ्यांसाठी पर्यावरणाची अमूल्य देणगी देणे होय,' असे मत संस्थेचे संस्थापक संतोष जाधव यांनी व्यक्त केले. आषाढी वारीसाठी आलेल्या अनेक वारकऱ्यांनी या उपक्रमाचे स्वागत करत आपल्या गावात वृक्षलागवडीची चळवळ उभी करण्याचा संकल्प व्यक्त केला. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी इच्छुकांनी सुशिला देवी सोशल वेल्फेअर फाउंडेशनचे संस्थापक संतोष जाधव यांच्याशी ९००४४३८६६८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आयटीआय प्रशिक्षकांच्या राज्यस्तरीय TOT प्रशिक्षणाचा समारोप



**नागपूर :** संताजी जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, श्रद्धानंद पेठ येथे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया मार्फत आयोजित राज्यस्तरीय TOT (Training of Trainers) प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप नुकताच कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

यावेळी माजी कुलगुरू डॉ. चांदेकर, आयएमसी अध्यक्ष गिरीश देशमुख, सहसंचालक पी. टी. देवतळे, उपसंचालक हेमंत आवारे, उपसंचालिका एस. एस. कुलकर्णी, जिल्हा व्यवसाय शिक्षण अधिकारी पी. जी. ठाकरे व 6 विभागामधील 40 शिल्प निदेशक (TOT) ट्रेनिंग करता उपस्थित झाले होते तसेच ASEF, TDM, फिटर, व्यवसायातील राज्यभरातील शिल्प निदेशक या ट्रेनिंग करता उपस्थित होते. मंत्री लोढा यांनी सांगितले की, राज्यातील सहाही प्रादेशिक विभागांतील प्रशिक्षकांना या प्रशिक्षणाद्वारे आधुनिक तंत्रज्ञान, उद्योगाभिमुख अध्यापन आणि कौशल्यविकासाचे प्रशिक्षण देण्यात आले. २० टक्के सैद्धांतिक आणि ८० टक्के प्रात्यक्षिक प्रशिक्षणामुळे आयटीआयमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

प्रशिक्षणादरम्यान आधुनिक यंत्रसामग्री, उद्योगभेटी, अध्यापन पद्धती व मूल्यांकन प्रक्रियेचे मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षण यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दल मंत्री लोढा यांनी संस्थेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश केने यांनी तर आभार उपसंचालिका एस. एस. कुलकर्णी यांनी मानले. अशी माहिती प्रसिद्धी प्रमुख सहदेव चव्हाण यांनी दिली.

# बसपातर्फे बाईक रॅली काढून आरक्षण दिन साजरा



**नागपूर :** बहुजन समाजाचे आरक्षणाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १२४ व्या आरक्षण दिनानिमित्त बहुजन समाज पक्षाच्या (बसपा) 'कही एम भूल न जाये' या राष्ट्रीय अभियानांतर्गत व 'संडे इज ए मिशन डे' उपक्रमाअंतर्गत दक्षिण नागपूर व दक्षिण-पश्चिम विधानसभा क्षेत्राच्या वतीने भव्य बाईक रॅली काढण्यात आली.

त्रिशरण चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून रॅलीला सुरुवात झाली. जयभीम नगर, न्यू बाबुलखेडा, कौशल्यायन नगर, कुकडे ले-आऊट, चंद्रमणी नगर, विश्वकर्मा नगर, वंजारी नगर, जाटतरोडी, इमामवाडा, रामबाग आदी भागांतून आरक्षणाच्या समर्थनार्थ घोषणा देत रॅली मेडिकल चौकात पोहोचली. तेथे तिचे रूपांतर आरक्षण दिन समारंभात झाले.नागपूर शहर बसपाचे अध्यक्ष अनिकेत कुत्तरमारे यांच्या अध्यक्षतेखाली व महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम झाला. यावेळी सहदेव पिल्लेवान, सौरभ जामगडे, किरण गौरखेडे, कविता लांडगे, डॉ. सरोज गजभिये, रमा इंगळे, भीमराव गजभिये, शुभम पिल्लेवान, पंकज नाखले, चंद्रशेखर कांबळे, बालचंद्र जगताप, नरेश गायकवाड, संगीतबाबू इंगळे व महिपाल सांगोडे यांनी आरक्षणाबाबत आपली भूमिका मांडली.

मेडिकल चौकातील राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रस्तावित स्मारकाबाबत १५ ऑगस्टपर्यंत घोषणा करावी, अन्यथा बसपातर्फे उग्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन नितेश घुटके यांनी, तर समारोप अरुण शेवडे यांनी केला. रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी पियुष मेश्राम, धर्मपाल वाडके, रामदास मेश्राम, किशोर बनसोड, गजानन मेश्राम, हेमंत बोरकर, जगदीश गेडाम, संभाजी लोखंडे, सुनील सोनटक्के, किशोर शेवडे, मोहित ताकसांडे, शुभम इंगळे, रामू जाधव, अनिल गरडकर, गौतम फुलझले, आकाश खोब्रागडे आणि गौतम धाबर्डे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# हुपरी येथे सातवी एकदिवसीय धम्म संगीतीत धम्म संस्कार, बौद्ध सण आणि शब्दावलीवर मंथन



**हुपरी (जि. कोल्हापूर) :** बौद्ध समाजात जेव्हा-जेव्हा सुधारणा करण्याची आवश्यकता निर्माण झाली, तेव्हा-तेव्हा सर्वांनी एकत्र बसून विचारमंथन करून निर्णय घेण्याची परंपरा राहिली आहे. आजची धम्म संगीती ही त्याच लोकशाही आणि सामूहिक निर्णय प्रक्रियेचा एक भाग असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध चित्रपट अभिनेते डॉ. कीर्तिपाल गायकवाड यांनी केले. हुपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनात बौद्ध समाजाच्या वतीने सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत सुमारे १०० प्रतिनिधींची सातवी एकदिवसीय धम्म संगीती आयोजित करण्यात आली होती. या संगीतीचे उद्घाटन डॉ. गायकवाड यांच्या हस्ते झाले.

या धम्म संगीतीमध्ये धम्म संस्कार विधीमध्ये एकसूत्रता, बौद्ध सणांचे स्वरूप व साजरीकरण तसेच बौद्ध शब्दावलीची निर्मिती या तीन महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल चर्चा व विचारमंथन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मंडळात बुद्ध विहार समन्वय समितीचे अध्यक्ष अशोक सरस्वती बौद्ध (नागपूर), राहुल खांडेकर (पुणे), प्रा. भारत शिरसाट (औरंगाबाद), प्रकाश जाधव (मुंबई), युवा बौद्ध धम्म परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. किरण भोसले (हुपरी), बापूसाहेब राजहंस (कोल्हापूर), मधुकर सामंत (मुरगूड-कागल), वसंतराव खांडेकर (सरनौबतवाडी, करवीर), भारतीय बौद्ध महासभेचे दिलीप कांबळे (मुरगूड) आणि हरिश्चंद्र लाडे (गोंदिया) यांचा समावेश होता. धम्म संगीतीचे मुख्य निमंत्रक बुद्ध विहार समन्वय समितीचे पश्चिम महाराष्ट्र महासचिव आनंद कांबळे होते. निमंत्रक मंडळात प्रा. डॉ. संतोष भोसले, नाना कांबळे, रवी माळगे, सुधाकर कांबळे, दिलीप शिंगाडे, सौरव देसाई, महेश मानगावकर तसेच भारतीय बौद्ध महासभेचे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष सातापा कांबळे यांचा समावेश होता. अशोक सरस्वती बौद्ध, राहुल खांडेकर आणि प्रा. भारत शिरसाट यांनी विविध सत्रांमध्ये तिन्ही विषयांवर सविस्तर भूमिका मांडत उपस्थित प्रतिनिधींना मार्गदर्शन केले. समारोप सत्रात प्रा. डॉ. किरण भोसले यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आनंद कांबळे यांनी केले. संचालन प्रा. डॉ. संतोष भोसले यांनी केले, तर दिलीप शिंगाडे यांनी आभार मानले. या धम्म संगीतीला सांगली, कोल्हापूर, सोलापूर, मुंबई, नागपूर, औरंगाबाद आणि गोंदिया जिल्ह्यांसह राज्यातील विविध भागांतून सुमारे १३० प्रतिनिधी उपस्थित होते.

# मॉ जिजाऊ सार्वजनिक वाचनालयात शहीदांना श्रद्धांजली



**अकोला :** कारगील विजय दिनानिमित्त न्यू महसूल कॉलनी, खडकी बु. येथील मॉ. जिजाऊ सार्वजनिक वाचनालयात शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त तहसीलदार आत्माराम तेलगोटे होते. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष पंजाबराव वर यांनी कारगील युद्धाच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शन करताना सांगितले की, १९९९ मध्ये पाकिस्तानी घुसखोरांनी हिवाळ्याचा फायदा घेत भारताच्या उंच पर्वतशिखरांवर कब्जा करून श्रीनगर-लेह महामार्गावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला होता. सुमारे १८ हजार फूट उंचीवर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत भारतीय जवानांनी शौर्य, धैर्य आणि त्यागाचे अद्वितीय दर्शन घडवत शत्रूला पराभूत केले आणि कारगीलच्या शिखरांवर पुन्हा तिरंगा अभिमानाने फडकविला. या युद्धात ५२७ भारतीय जवानांना वीरमरण आले, तर अनेक जवान जखमी झाले. त्यांच्या सर्वोच्च बलिदानाच्या स्मरणार्थ देशभरात कारगील विजय दिन साजरा केला जातो, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात लहान बालकांनी देशभक्तीपर गीते सादर करून शहीद जवानांच्या शौर्यगाथा उपस्थितांसमोर मांडल्या. यामुळे कार्यक्रमाला राष्ट्रभक्तीचे प्रेरणादायी स्वरूप प्राप्त झाले. या प्रसंगी सेवानिवृत्त कर्मचारी रत्नाकर भुजाडे, ग्रंथालय अधिकारी अजय शिरसाट, सुभाष इंगळे, रेखा झिने, भगवान झिने, मनिषा भुजाडे, मिनाक्षी शेगोकार, सुवर्णा ठाकरे, सुरेखा सोनोने, जयश्री झिने, विद्या अंभोरे, सार्थक भुजाडे, रोशन शेगोकार, अजिंक्य सोनोने तसेच ईश्वरी, समृद्धी, मनस्वी, अनूजा, श्रव्या, मंजिरी आणि वेदांशी यांच्यासह अनेक नागरिक व बालकांची उपस्थिती होती.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648